७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. ११ जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# ५० हजारांऐवजी २ लाखांपर्यंतचं कर्ज माफ होणार

## प्रोत्साहनपर अनुदानाची २०२६-२७चं कर्ज भरण्याची अट काढली, देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा

**मुंबई (दै. संध्या)**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना माहिती दिली आहे. महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंतचा लाभ मिळणार होता तो आता 2 लाख रुपयांपर्यंत मिळेल आणि प्रोत्साहनपर अनुदानासाठीची 2026-27 चं पीक कर्ज भरण्याची अट रद्द करतो, अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली. कर्जमाफीच्या निर्णयासाठी 2029 पर्यंत थांबू शकलो असतो मात्र आम्ही तसं केल नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

कर्जमाफीच्या संदर्भात इथं बरीच चर्चा झाली. कर्जमाफी हा परिस्थितीची आवश्यकता म्हणून करत आहोत. कुठल्याही कर्जमाफीनं शेतकरी श्रीमंत झाला नाही तो होऊ शकत नाही. शेतकऱ्याकडे सावकाराकडे जावं लागू नये हा एक उद्देश कर्जमाफीचा असतो. आम्ही विधानसभा निवडणुकीच्या वेळी कर्जमाफी करण्याचा शब्द दिला होता, आम्ही 2029 पर्यंत थांबू शकलो असतो, आम्ही सर्व निवडणुका जिंकलो आहोत, मात्र आम्ही तसं केले नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

शेतकरी अडचणीत असेल तर त्याला कर्जमाफी दिली पाहिजे हे ठरवलं आणि आपल्या सरकारनं कर्जमाफीचा निर्णय केला. कर्जमाफी, एकवेळ समझोता आणि प्रोत्साहनपर अनुदानाचा निर्णय घेतला. महायुती सरकार दरवर्षी 25 हजार कोटी रुपयांची वीज माफी सरकार करतेय. दरवर्षी हे पैसे दिले जातात, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

2008 मध्ये देशात कर्जमाफी झाली, त्यानंतर 2009 मध्ये कर्जमाफी करण्यात आली. त्यावेळी 2008 मध्ये ज्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला त्यांना 2009 मध्ये वगळलं होतं. 2026-27 च्या कर्जाची परतफेड केली पाहिजे, अशी अट टाकली होती, ज्यांना प्रोत्साहनपर लाभ देतोय, त्यांनी कर्ज वेळेत भरलं पाहिजे अशी भूमिका त्यामागील होती, असं देवेंद्र फडणीस म्हणाले. सातत्यानं या संदर्भात अटी शर्थी आहेत, अशी मागणी होत होती. रणधीर सावरकरांच्या नेतृत्वात महायुतीचे आमदार भेटले आणि 50 हजारांची अट काढून टाका, अशी मागणी केली. मी त्यांना अट काढून टाकल्यानं 4-5 हजार कोटींचा बोजा येईल. पण शिस्तीचा भाग म्हणून ही अट आणली आहे, समजा एक लाखांपर्यंत नेली तर 2 लाख शेतकरी फायदा न मिळणारे राहतात. सगळ्याचं मत होतं, 2 लाख शेतकरी का सोडता. मी आर्थिक शिस्त सांगत होतो, ते लोक मला व्यापक विचार केला पाहिजे होते, असं सांगत होते.

महात्मा फुले कर्जमाफीमधील योजनेतील जे लोक होते ज्यांना 50 हजारांपर्यंत कर्जमाफी म्हटलं होतं. त्यांना देखील 2 लाखांपर्यंत कर्जमाफी देण्यात येईल. 2026-27 चा कर्ज भरण्यासंदर्भातील नियम वगळण्यात येईल. 2026 ला किती लोकांनी भरले याची माहिती आहे. 95 टक्के लोकांनी पैसे भरले. त्या अगोदरच्या तीन पैकी दोन वर्षात ज्यांनी पैसे भरले ते आता पात्र होतील, पहिल्यांदा असा निर्णय झाला आहे, यापूर्वी असा निर्णय झालेला नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

# मिमिक्री आर्टिस्ट म्हणत फडणवीसांचा राज ठाकरे यांच्यावर पलटवार

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यात गेल्या 4 दिवसांपासून मिसिंग लिंक चांगलाच चर्चेत आला असून मिसिंग लिंकवर कोसळेलेल्या दरड दुर्घटनेनंतर राजकीय वातावरण तापलं आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा सभागृहातून विरोधकांवर हल्लाबोल केला. मिसिंग लिंकसंदर्भाने टीकाकारांना लक्ष्य करताना, एकवेळ माझा अपमान करा पण महाराष्ट्राचा अपमान सहन करणार नाही, असे फडणवीसांनी म्हटले. त्यावरुन, मनसेप्रमुख राज ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले. मिसिंग लिंकवरुन बोलल्यावर तुमचा अपमान कसा झाला? असा सवाल राज ठाकरेंनी विचारला. तसेच, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे ना तू, मग हिंदीत का बोलता? असा सवालही उपस्थित केला होता. त्यावर, आता फडणवीसांनी मिमिक्री आर्टिस्ट म्हणत राज ठाकरेंना टोला लगावला. कनेक्टींग लिंक संदर्भात 7 हजार पाण्यात गेले हा माझा अपमान नाही, हा महाराष्ट्राचा अपमान आहे. खोट्या बातम्या पेरणं, त्या पसरवणं हा महाराष्ट्राचाच अपमान आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला सभागृहात प्रत्युत्तर दिलं. तसेच, मिमिक्री आर्टिस्ट म्हणत मनसेप्रमुख राज ठाकरेंनी केलेल्या टीकेवरही पलटवार केला. मी हिंदीत बोललो, 'भाडे ते टट्टू' म्हटल्यावर काहींना दु:ख झालं. त्यामुळे, जाऊन मी अभ्यास केला, भाडे टे टट्टू या शब्दाला आता सुसंस्कृत भाषेत 'भाटक गदर्भ' म्हणतो, तरीही कोणाला समजलं नसेल तर सुपारीबाज... असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंवर पलटवार केला.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

# मंगलप्रभात लोढांनी उद्यापासून नट-बोल्ट, सिमेंट खावे

**मुंबई (दै. संध्या)**



■ शेतकऱ्यांनी पिकवलेलं अन्न खाऊ नये; रविकांत तुपकरांची संतप्त टीका, म्हणाले- अन्नदात्याची माफी मागा

क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी शेतकऱ्यांबद्दल केलेल्या विधानावर संतप्त टीका केली आहे. भारत शेतकऱ्यांमुळे सोने कि चिडिया नव्हता असे विधान लोढांनी केले होते. यावर टीका करताना तुपकर म्हणाले की, मंगलप्रभात लोढांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध करावा तेवढा कमी आहे. हा देश पूर्वीही कृषीप्रधान होता, आजही कृषीप्रधान आहे आणि भविष्यातही कृषीप्रधान राहील. मंगलप्रभात लोढाजी तुमचं हे वक्तव्य शेतकऱ्यांचा अपमान करणारं आहे. तुम्ही हे वक्तव्य मागं घेतलं पाहिजे आणि देशातल्या तमाम शेतकऱ्यांची माफी मागितली पाहिजे. तुपकर पुढे म्हणाले की, हा देश स्टार्टअपच्या भरवश्यावर नाही, तर शेतकऱ्यांच्या भरवश्यावर मोठा झाला आहे, हे लक्षात ठेवा. अजून अंबानी-अदानीच्या कारखान्यात ज्वारी-बाजरी-सोयाबीन-कापूस पिकवण्याचं तंत्रज्ञान जन्माला आलेलं नाही. त्याच्यासाठी तुम्हाला आमच्या वावरातंच यावं लागेल. तुपकर पुढे म्हणाले की, एवढा तुम्हाला शेतकऱ्यांबद्दल तिटकारा वाटतो, तर मंगलप्रभात लोढांनी उद्यापासून आपल्या ताटामध्ये शेतकऱ्यांनी पिकवलेलं अन्न न घेता कारखान्यातून तयार झालेले नट-बोल्ट खावे, सिमेंट खावं. कारखान्यात जे-जे तयार होतं, धातू खावे. शेतकऱ्यांचं अन्न त्यांनी खाऊ नये. तत्काळ शेतकऱ्यांची माफी मागा, अन्यथा मलबार हिलला तुमच्या घरासमोर शेतकऱ्यांना घेऊन आम्ही आंदोलन करू. भारताला शेतीमुळे सोने की चिडिया म्हणत नव्हते, तर घरोघरी स्टार्टअपमुळे भारताला सोने की चिडिया म्हणायचे, असे विधान मंगलप्रभात लोढांनी केले होते. लोढांच्या वक्तव्यानंतर नव्या वादाला तोंड फुटले असून यावर टीकेची झोड उठताना दिसत आहे.

# सासवड नगरीत वारीचा भक्तिमय जल्लोष

## संत सोपानकाका पालखी प्रस्थानाची जय्यत तयारी पूर्ण

**नीरा (दै. संध्या)**



श्रीक्षेत्र सासवडमध्ये संत सोपानदेव महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी दिंड्या सासवडमध्ये दाखल होत असून "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "जय जय राम कृष्ण हरी"च्या अखंड गजराने संत सोपानदेव महाराज समाधी मंदिर परिसर दुमदुमून गेला आहे.

संत सोपानदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी शुक्रवारी पहाटेपासूनच भाविकांनी मोठ्या रांगा लावल्या. हजारो वारकरी समाधीचे दर्शन घेत हरिनामाच्या गजरात वारीचा आनंद अनुभवत आहेत. मंदिरात काकड आरती, महापूजा, हरिपाठ आणि भजनाच्या कार्यक्रमांनी वातावरण अधिकच भक्तिमय झाले आहे.

सोमवारी (दि. 12) सकाळी 11 वाजता हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत श्री संत सोपानदेव महाराज पालखी सोहळ्याचे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. या सोहळ्याची सर्व तयारी पूर्ण झाली असून पालखी, रथ, मंदिर परिसर आणि स्वागत व्यवस्थेची अंतिम पाहणी करण्यात आली आहे. याबाबतची माहिती सोपानदेव समाधी मंदिर ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त ॲड. त्रिगुण गोसावी यांनी दिली.

पालखी सोहळ्यानिमित्त रथाला नव्याने आकर्षक झळाळी देण्यात आली असून पादुका ठेवण्यासाठी नवीन सिंहासन तयार करण्यात आले आहे. सोपानकाका बँकेच्या वतीने संपूर्ण पालखी मार्गावर रथाची भव्य फुलांनी सजावट करण्यात येणार आहे. तसेच सासवडमधील महाजन परिवार व तालुक्यातील विविध सेवाभावी संस्थांकडून हजारो भाविकांसाठी केळी, राजगिरा पाकिटे, चहा, दूध आदींचे वाटप सुरू आहे.

दरम्यान, शनिवारी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचेही लाखो वारकऱ्यांसह सासवडमध्ये आगमन होणार असल्याने शहरात दुहेरी भक्तिमय उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याचबरोबर, श्री संत सोपानदेव महाराज पालखी प्रस्थानानंतर काही वेळातच श्री संत योगीराज चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळाही श्रीक्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ होणार असून रविवारी रात्रीचा मुक्काम पारगाव मेमाणे येथील श्री पारेश्वर मंदिरात होणार आहे.

एकूणच, सासवड नगरीत वारकरी, दिंड्या, टाळ-मृदुंगाचा निनाद, हरिनामाचा अखंड गजर आणि संतांच्या दर्शनासाठी लागलेल्या भाविकांच्या रांगांमुळे वारीचा आनंदोत्सव शिगेला पोहोचला असून संत सोपानकाका पालखी सोहळ्याच्या प्रस्थानाकडे संपूर्ण वारकरी संप्रदायाचे लक्ष लागले आहे.

## ढिंग-टांग




### AAIB च्या अहवालानंतर CBI तपास हाती घेणार, CM फडणवीस यांची माहिती

# विमान अपघाताचा सीआयडी, AAIB द्वारे तपास

**मुंबई (दै. संध्या)**



विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. या अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला विधानसभेत उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध मुद्यांवर भाष्य केलं. यावेळी अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास कुठपर्यंत आला? एएआयबीचा अंतिम रिपोर्ट कधी येईल? या घटनेचा तपास किती आणि कोणत्या तपास यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे? याबाबत सविस्तर माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत बोलताना सांगितली आहे.

"एका अतिशय महत्वाच्या विषयावर अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये चर्चा झाली. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेच्या तपासासंदर्भात चर्चा झाली. आधी मी हे स्पष्ट करू इच्छितो की दोन प्रकारे तपास सुरू आहे. सीआयडी देखील तपास करत आहे आणि AAIB देखील तपास करत आहे. मात्र, एक मुद्दा असाही उपस्थित करण्यात आला की, सीबीआय का तपास करत नाही? पण सीबीआयने हे स्पष्टपणे सांगितलं की एएआयबीचा जो रिपोर्ट आहे तो महत्वाचा आहे. एएआयबीचा जो रिपोर्ट येईल, तो आल्यानंतरच आम्ही तपास घेऊ शकतो, त्याआधी आम्ही तो तपास काही घेणार नाही. त्यामुळे आपण एएआयबीच्या रिपोर्टची वाट पाहत आहोत", अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली आहे.

"अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेचा सीआयडीने जो काही तपास केला, त्या तपासात काही गोष्टी समोर आलेल्या आहेत. यामध्ये वेगवेगळ्या गोष्टींबरोबर एक शंका ही पायलट सुमित कपूर यांच्याबद्दलही होती. त्यांची बँक खाती, इन्शुरन्स पॉलिसी, शेअर मार्केटमधील गुंतवणूक हे सगळं तपासण्यात आलं. पण त्यामध्ये कुठेही काहीही संशयास्पद आढळून आलं नाही. तसेच जेवढे फुटेज आहेत, ते सर्व मिळवलेले आहेत. त्याचंही विश्लेषण केलं आहे. जे काही उपलब्ध साक्षी पुरावे आहेत ते तयार केलेले आहेत", अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली. "यामध्ये एएआयबीचा रिपोर्ट महत्वाचा आहे. त्याबाबतची माहिती देखील मी घेतली असता सांगण्यात आलं की काही डॉक्युमेंट आणि डेटा डाऊनलोड करायचा होता, तो १०० टक्के डाऊनलोड झाला आहे. त्यामध्ये कुठलीही अडचण नाही. जो ब्लॅक बॉक्स आहे तेही सगळं झालेलं आहे. आता एक प्राथमिक रिपोर्ट त्यांनी आपल्यासमोर आणलेला आहे. मी याबाबत केंद्र सरकारशी देखील चर्चा केली. केंद्र सरकार, मंत्रालय आणि मंत्री महोदयांना मी विचारलं की साधारण हा सर्व रिपोर्ट किती दिवसांत येईल? तेव्हा मला त्यांनी सांगितलं की जानेवारीच्या पूर्वी अंतिम रिपोर्ट येईल", अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

"जसं काल रोहित पवार म्हणाले की कधी-कधी तीन ते चार वर्ष लागतात, ते खरं आहे. पण या केसमध्ये केंद्र सरकारने विनंती केलेली आहे. कारण सगळे परदेशातले तज्ञ यामध्ये घेतले आहेत. अमेरिकेतली एक एजन्सी देखील यामध्ये घेतलेली आहे. आपण दुर्देवाने असं म्हणू नये, पण दादांच्या पुण्यतिथी आधी हा रिपोर्ट यावा असा प्रयत्न आहे. हा रिपोर्ट आल्यानंतर सीबीआय असेल किंवा सीआयडी. आता सीआयडी देखील त्या रिपोर्टसाठी अडकली आहे. कारण वर आकाशात काय घडलं? हे या रिपोर्टशिवाय समजू शकत नाही, ते धागेदोरे यामध्ये मिळणार आहेत", असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत बोलताना म्हटलं आहे.

# पावसाळी अधिवेशन : तिजोरीवर पहिला हक्क बळीराजाचा

■ वारकऱ्यांसाठी एअर ॲम्ब्युलन्सची शिंदेंकडून घोषणा; उद्धव ठाकरेंवरही निशाणा

**मुंबई (दै. संध्या)**



राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध प्रश्नांवरून जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. छत्रपती संभाजीनगरच्या पाणी प्रश्नावरून विरोधकांनी सरकारला घेरले, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'भारतरत्न' प्रस्तावावरून भाजपचेच ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनावर तीव्र संताप व्यक्त केला. याशिवाय राज्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, कोविड काळातील बेस्ट ई-बस घोटाळ्याची चौकशी आणि भेसळखोरांना फाशीची शिक्षा देण्यासारख्या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि जनसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या मुद्द्यांवर आज सभागृहात मोठी आणि वादळी चर्चा पार पडली. सरकारकडूनही यावर अनेक महत्त्वाच्या घोषणा आणि चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

विधान परिषदेच्या सभागृहात बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, हे अधिवेशन लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी असते. परंतु, इकडे सभागृहात चर्चा कमी आणि तिकडे पायऱ्यांवर, मीडियासमोर आणि शिव्याशाप देतात. विरोधक हा गोंधळलेला आणि भरकटलेला विरोधी पक्ष असल्याचे पाहायला मिळाले. बहुमत असले आमच्याकडे तरी सुद्धा लोकशाहीत विरोधी पक्षातल्या सदस्यांचे म्हणणे ऐकून घेणारे आहोत. अशी चर्चा व्हायला पाहिजे होती, पण ती झाली नाही. त्यात खोटे-नाटे आरोप करण्यात आले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, पावसाचे मोठे संकट आपल्यावर आले होते. शेतकऱ्यांचे नुकसान होत होते. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिले आहे. परंतु, सुदैवाने एक जुलैपासून पाऊस सक्रिय झाला आणि आपण सुटकेचा निश्वास सोडला. आता पावसाच्या संदर्भात आपण आढावा घेत आहोत. अनेक ठिकाणी अपेक्षेपेक्षा जास्त पाऊस पडला. काही ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. मात्र, मराठवाडा आणि विदर्भात पाऊस कमी झाला ही चिंतेची बाब आहे.

हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्याकडे देखील आपले लक्ष आहे. परंतु, या ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचा प्रश्न असेल, जनतेच्या सुरक्षेचा असेल, या सगळ्या विषयांवर बोलताना तथ्य बोलणे अपेक्षित होते. परंतु, विरोधासाठी केवळ विरोध करू नये. पावसाचे राजकारण करण्यात आले. वस्तुस्थिती आहे की पावसामुळे नुकसान झाले आहे. सविस्तर वाचा..

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना 'भारतरत्न' देण्याबाबतचा शासकीय ठराव २०१९ पासून अद्याप प्रलंबित असल्याने भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत उद्वेग व्यक्त केला. यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तांत्रिक कारणांचा दाखला देत पुढील अधिवेशनात हा प्रस्ताव प्राधान्याने मांडण्याचे आश्वासन दिले. दुसरीकडे, अन्नातील वाढत्या भेसळीवर कठोर कायदा करण्याची मागणी आमदार प्रकाश सोळंके यांनी केली. यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवळ यांनी विद्यमान कायद्यानुसार भेसळखोरांना मृत्युदंडापर्यंतच्या शिक्षेची तरतूद असल्याचे स्पष्ट केले. तसेच, विधान परिषदेत छत्रपती संभाजीनगरच्या पाणीपुरवठा योजनेत निकृष्ट साहित्याचा वापर झाल्याच्या मुद्द्यावरून आमदार अंबादास दानवे यांनी सरकारला धारेवर धरले; ज्यावर मंत्री उदय सामंत यांनी तातडीने स्वतंत्र समिती नेमून चौकशी करण्याची मोठी घोषणा केली.

# संपादकीय

## भ्रष्टाचाराविरुद्ध लढणाऱ्या व्यवस्थेची गरज

महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेबाबत सामान्य नागरिकांच्या मनात आज एकच प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे. भ्रष्टाचारावर खऱ्या अर्थाने लगाम कधी बसणार? शासनाच्या विविध विभागांमध्ये भ्रष्टाचार, अनियमितता, विलंब आणि निष्क्रियतेच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांचा शासनावरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अशा वातावरणात कठोर, शिस्तप्रिय आणि नियमांची तडजोड न करणारे अधिकारी समाजात वेगळी ओळख निर्माण करतात. वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे हे त्यापैकी एक नाव म्हणून अनेकदा चर्चेत राहिले आहे. विविध पदांवर कार्यरत असताना त्यांनी नियमाधिष्ठित कारभार, पारदर्शकता आणि भ्रष्टाचाराविरोधातील कठोर भूमिका घेतल्यामुळे त्यांची प्रतिमा जनाभिमुख अधिकारी अशी तयार झाली. त्यांच्या अनेक निर्णयांचे कौतुक झाले, तर काही निर्णयांवर वादही निर्माण झाले; मात्र नियमांच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी तडजोड केली नाही, अशी धारणा समाजात आहे.

याच पार्श्वभूमीवर त्यांची राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्याची मागणी काही स्तरांतून पुढे येत आहे. या मागणीमागे एका अधिकाऱ्यावरील विश्वासापेक्षा सक्षम आणि निर्भीड प्रशासनाची अपेक्षा दडलेली आहे. नागरिकांना अशा नेतृत्वाची गरज वाटते, जे कोणत्याही दबावाला बळी न पडता जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देईल. मात्र, वस्तुस्थिती अशी आहे की भ्रष्टाचार हा केवळ एका व्यक्तीच्या नियुक्तीने संपणारा प्रश्न नाही. तो संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेशी निगडित विषय आहे. नियमांची प्रभावी अंमलबजावणी, उत्तरदायित्व, तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक प्रक्रिया, सक्षम चौकशी यंत्रणा आणि राजकीय इच्छाशक्ती या सर्वांचा समन्वय झाल्याशिवाय भ्रष्टाचारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे कठीण आहे. राज्यातील प्रत्येक सनदी अधिकाऱ्याने आपल्या अधिकारांचा वापर जनहितासाठी, निर्भीडपणे आणि निष्पक्षपणे करणे ही काळाची गरज आहे. प्रामाणिक अधिकारी हे अपवाद नसून संपूर्ण व्यवस्थेची ओळख बनली पाहिजे. नागरिकांना व्यक्तिपूजा नको, तर विश्वासार्ह आणि पारदर्शक प्रशासन हवे आहे. मुख्य सचिवपदासारख्या सर्वोच्च प्रशासकीय पदावरील नियुक्त्या शासनाच्या निश्चित नियम, वरिष्ठता, अनुभव आणि प्रशासकीय निकषांनुसार केल्या



जातात. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या नियुक्तीचा निर्णय हा शासनाच्या अधिकारक्षेत्रातील विषय आहे. परंतु या मागणीमधून व्यक्त होणारी जनभावना शासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

आज महाराष्ट्राला एका व्यक्तीची नव्हे, तर प्रत्येक विभागात तितक्याच प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि धाडसी अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. प्रशासनातील उत्तरदायित्व वाढले, भ्रष्टाचाराविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण राबवले आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांना संरक्षण मिळाले, तरच जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल. भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्राची उभारणी ही कोणत्याही एका अधिकाऱ्याची किंवा सरकारची जबाबदारी नसून संपूर्ण प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच शक्य आहे. प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जनहित या तीन मूल्यांवर उभे राहणारे प्रशासनच महाराष्ट्राला सुजलाम-सुफलाम आणि विश्वासार्ह राज्य म्हणून पुढे नेऊ शकते.

## संस्कृत सुभाषित

सुबीजं चैव सुक्षेत्रे जातं संपद्यते यथा॥

अर्थ : उत्तम बीज उत्तम शेतात पडले तर उत्तम प्रकारचे पिक येते.

## गुरु वचन

### पंचायतीचा निर्णय

एकदा एक हंस आणि हंसिणी हरिद्वारच्या सुरम्य वातावरणातून भटकत उजाड, निर्जन आणि वाळवंटात आले.

हंसिणी हंसाला म्हणाली की, आपण कोणत्या भागात आलो आहोत? इथे तर पाणी नाही, जंगल आणि थंड हवादेखील नाही. इथे तर आपले जगणे कठीण होईल. भटकताना सायंकाळ झाली तेव्हा हंसाने हंसिणीला म्हटले की, आजची रात्र कशी तरी घालवू या. आपण सकाळी हरिद्वारला परतू या!

रात्र झाली तेव्हा झाडाखाली हंस आणि हंसिणी थांबले होते त्या झाडावर एक घुबड बसले होते.ते जोराने ओरडू लागले.

हंसिणीने हंसाला विचारले अरे इथे तर रात्री झोपू शकत नाही. हे घुबड ओरडत आहे. हंसाने पुन्हा हंसिणीची समजूत काढली की, कशी तरी रात्र घालवू या.आता मला कळले की हा प्रदेश ओसाड आहे.असे घुबड ज्या भागात राहतील तो तर विराण आणि ओसाड राहीलच. झाडावर बसलेले घुबड दोघांचे बोलणे ऐकत होते. सकाळ झाली तेव्हा घुबड खाली आले आणि त्याने म्हटले की, हंसभाऊ माझ्यामुळे रात्री तुम्हाला खूप त्रास झाला मला माफ कर. हंस म्हणाला, काही हरकत नाही, तुझे आभार!

असे म्हणून हंस आपल्या हंसिणीला घेऊन जसाच पुढे निघाला तेव्हा मागून घुबड ओरडले, अरे हंसा माझ्या पत्नीला घेऊन कुठे चाललास? हंस चपापला त्याने म्हटले तुझी पत्नी? अरे , ही हंसिणी आहे, माझी पत्नी आहे. माझ्यासोबत आली होती, माझ्यासोबत जात आहे.

घुबड म्हणाले, चूप बस, ही माझी पत्नी आहे.दोघांचा वाद वाढला. सर्व लोक गोळा झाले. अनेक गावातील जनता बसली. पंचायत बोलावण्यात आली. पंच लोकही आले. त्यांनी विचारले, कशाचा वाद आहे? लोकांनी सांगितले घुबडाचे म्हणणे आहे की, हंसिणी त्याची पत्नी आहे आणि हंस म्हणतोय हंसिणी त्याची पत्नी आहे!

दीर्घ बैठक आणि पंचायतीनंतर पंच बाजूला झाले आणि म्हणाले की, हंसिणी हंसाची पत्नी आहे, ही गोष्ट खरी आहे. मात्र हंस आणि हंसिणी तर आता थोड्यावेळात या गावातून निघून जातील. आमच्यात तर फक्त घुबडच राहील. त्यामुळे निर्णय घुबडाच्या बाजूनेच द्यायचा आहे. मग पंचांनी आपला फैसला सुनावला आणि म्हटले की, सर्व तथ्य आणि पुरावे तपासल्यानंतर ही पंचायत या निष्कर्षावर येते की, हंसिणीची घुबडाची पत्नी आहे आणि हंसाला ताबडतोब गाव सोडून जाण्याचा आदेश देते.

हे ऐकताच हंस हैराण झाला आणि रडू लागला. पंचायतने चुकीचा निर्णय दिला असे ओरडू लागला. घुबडाने माझी पत्नी घेतली! रडत ओरडत तो निघाला तेव्हा घुबडाने त्याला हाक मारली. ऐ मित्र हंस, थांब ! हंसाने रडतच विचारले बाबा आता आणखी काय करणार आहेस? पत्नी तर तू घेतलीच आहेतस. आता काय जीव घेणार?

घुबड म्हणाले, नाही मित्रा, ही हंसिणी तुझी पत्नी होती आणि आहे! मात्र काल रात्री जेव्हा मी ओरडत होतो तेव्हा तू तुझ्या पत्नीला म्हणाला होतास की, हा प्रदेश विराण आणि ओसाड आहे कारण इथे घुबड राहतो! मित्रा,हा प्रदेश विराण आणि ओसाड तो इथे घुबड राहता म्हणून नाही तर, इथे असे पंच राहतात जे घुबडाच्या बाजूने निर्णय देतात.

स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतरही आपल्या देशाच्या दुर्दशेचे मूळ कारण बहुधा हेच आहे की, आपण आपला निर्णय घुबडांच्या बाजूने सुनावला आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत.

## दैं. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १००७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | | | | 5 | | |
| | | | 7 | 8 | 4 | | 2 | 6 |
| | 8 | 2 | 9 | | 5 | | 7 | 1 |
| | | 5 | | | | | 4 | |
| | | 9 | 8 | | 3 | 1 | | |
| | 4 | | | | | 2 | | |
| 9 | 7 | | 2 | | 6 | 8 | 5 | |
| 1 | 6 | | 3 | 5 | 7 | | | |
| | | 3 | | | | | | 7 |

### : सूडोकु :


खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १००६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 9 | 5 | 8 | 3 | 7 | 6 | 1 | 4 |
| 7 | 4 | 8 | 1 | 9 | 6 | 3 | 2 | 5 |
| 3 | 6 | 1 | 5 | 4 | 2 | 7 | 8 | 9 |
| 8 | 3 | 6 | 4 | 7 | 1 | 9 | 5 | 2 |
| 4 | 7 | 2 | 9 | 6 | 5 | 1 | 3 | 8 |
| 1 | 5 | 9 | 3 | 2 | 8 | 4 | 6 | 7 |
| 9 | 1 | 7 | 2 | 5 | 3 | 8 | 4 | 6 |
| 5 | 8 | 4 | 6 | 1 | 9 | 2 | 7 | 3 |
| 6 | 2 | 3 | 7 | 8 | 4 | 5 | 9 | 1 |

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १००७



**आडवे शब्द**

१. भारताचे माजी रेल्वेमंत्री
७. अकस्मात
९. दोन मैलांचे अंतर
११. प्रत्येक, शंकर
१२. प्रत्येक वर्षी
१४. पळून जाणे
१५. मोठे शहर, गाव
१६. कविता लिहणारा
१७. हट्टी
२०. फोडमधील द्रव
२१. रंग
२२. वारा, हवा
२३. कायदेशीर
२६. लाजीरवाणे
२७. हिचा 'एकच प्याला' अनेक कुटुंबांची वाहताहत करणारा
२९. फोल, व्यर्थ
३०. कारस्थानी
३२. बेचव
३४. 'बहिरी' शिकारी पक्षी
३६. मृत्यू नसलेला
३७. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
३८. नमस्काराचा एक शब्द
४१. पाप
४३. कोणत्याही गोष्टीतील 'अर्थ' (ला.)
४४. बैठक
४५. प्रमाणपत्र
४६. छातीत होणारी आग
४७. मऊ
४८. खोकला
५१. श्रावणी शेंगभाजी
५१अ. अफवा, वावडी
५२अ. 'एअर इंडिया'चे बोधचिन्ह
५३. तारणहार
५४. परिचय
५६. क्रिकेटमधील शून्य (इंग्रजी)
५७. बाजू, पक्ष
५८. गावगप्पांचे ठिकाण
६०. पगार
६२. ओरखडा
६४. छोटे चर्मवाद्य
६६. कशा प्रकारचा
७०. मौज, गंमत
७०अ. दोन वेळा म्हटल्यास एक देशी खेळ
७१. एक द्विदल धान्य
७२. शर्करा
७३. बातमी (हिंदी)
७४. पावलाचा खालचा भाग
७६. लहान मूल
७८. केवड्याचे रान
७९. धुणे
८०. आवरणातील छोटासा तुकडा
८१. यथेच्छ

**उभे शब्द**

१. संगोपन
२. तीन तास
३. तात्पर्य
४. आपसातील युद्ध
५. किंमत
६. वस्ती
८. चहा पिण्याचे जोडसाधन
९. कोकिळ (हिंदी)
१०. खळबळजनक
११. केसांची बट
१६. कान
१८. गंध
१९. केविलवाणा
२१. जेवणापूर्वी म्हणण्याचा श्लोक- '--- नाम घ्या श्रीहरीचे'
२२. घोडा
२४. करुणा, कीव
२५. दागदागिने
२७. सेवक
२८. विजयादशमी
३१. पुन्हा
३३. फळातील द्रव
३५. चाणक्यनिती
३७. पंकज
३८. ढीग
३९. चिंतन
४०. कलावंत
४२. सत्व
४३. राजनीतीशी संबंधित
४४. बोंबाबोंब, हाकाटी
४९. समानता
५०. पटाईत, निष्णात
५२. कढी, मठ्ठा, लस्सी असे याचे कितीतरी प्रकार!
५५. जखमेवरचा पापुद्रा
५९. आश्चर्य
६१. नजरेचा पहारा
६३. श्रीरामाचे स्तोत्रकवच
६५. न्याहारी
६७. कणीदार
६८. कौशल्य
६९. वस्तू, माल
७४. शरीर
७५. रस्ता, मार्ग
७६. कठीण प्रसंग
७७. विडा

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. १००६ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.निराधार ४.मुद्दाम ६.विकसनशील १०.रस ११.मटका १२.जवळ १३.लक्षण १४.मजा १५.दलाल १६.खारट १८.रक्तदान १९.दमा २१.सा.न.वि.वि. २४.परळी वैजनाथ २८.शक ३०.रमताराम ३१.साधना ३३.हालहवाल ३५.भजन ३७.पळवाट ३९.रन ४०.वलय ४१.बाजू ४२.हाव ४४.गीताई ४६.नवार ४८.तराजू ५०.नरम ५२.बरबाद ५३.अंगाई ५५.मासलेवाईक ५८.लालसर ५९.वासा ६१.करामत ६३.पापा ६५.तन ६६.खसखस पिकणे ६८.पाचर ६९.वाम ७१.यार ७२.रमल ७३.रग ७५.नवरदेव ७८.जवळचा ८१.भानगड ८२.परिवर्तन

उभे उत्तर : १.निरक्षर २.रास ३.रमजान ४.मुकादम ५.मजल दरमजल ६.विळखा ७.सपाट ८.शीलवान ९.लक्ष १४.मदारी १७.रमूज २०.माळी २१.साथ २३.विविध २३.कोमल २४.पराभव २५.वैरी २७.नारळ २८.शहाजहान २९.कल ३०.रवानगी ३१.साट ३२.नायक ३४.हर ३६.नयनबाग ३७.पगार ३८.वाजतगाजत ४१.बाजू ४३.वरमाला ४५.तालेवार ४७.वाद ४९.रावा ५१.मसलत ५२.बकवास ५४.तडीपार ५६.लेसन ५७.खुराक ६०.साखरझोप ६१.कपिलदेव ६२.मणेर ६३.पाचकळ ६४.हेवा ६६.खरवस ६७.सम ७०.मनन ७१.यादे ७४.गज ७६.वग ७७.रड ७९.वर्ण ८०.चावी

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १३४६ – लक्झेम्बर्गचा चार्ल्स पाचवा पवित्र रोमन सम्राटपदी.
- १४०५ – चीनचा झ्हेंग हे जहाजांचा तांडा घेउन जग धुंडाळायला निघाला.
- १५७६ – मार्टिन फ्रोबिशरला लांबून ग्रीनलँडचा किनारा दिसला.
- १७५० – कॅनडातील हॅलिफॅक्सशहर आगीत भस्मसात.
- १८०४ – अमेरिकेच्या उपराष्ट्रपती एरन बरने अर्थमंत्री अलेक्झांडर हॅमिल्टनला द्वंद्वयुद्धात ठार केले.
- १८११ – इटलीच्या आमादिओ ऍव्होगाड्रोने आपला वायुच्या अणुरचनेचा सिद्धांत प्रकाशित केला.

### राष्ट्रीय

- २००३ – १८ महिने बंद असलेली लाहोर–दिल्ली बस सेवा पुन– सुरू.
- २००६ – मुंबईत उपनगरी रेल्वे गाड्यांमध्ये स्फोट. १०० हून अधिक ठार.

### जन्म

- १२७४ – रॉबर्ट द ब्रुस, स्कॉटलंडचा राजा.
- १६५७ – फ्रेडरिक पहिला, प्रशियाचा राजा.
- १७६७ – जॉन क्विन्सी ऍडम्स, अमेरिकेचा ६वा राष्ट्राध्यक्ष.
- १८९० – नारायण हरी आपटे, जुन्या काळातील प्रसिद्ध कादंबरीकार.
- १९१६ – गॉफ व्हिटलॅम, ऑस्ट्रेलियाचा २१वा पंतप्रधान.
- १९३० – जॅक अलाबास्टर, न्यू झीलँडचा क्रिकेट खेळाडू.
- १९५० – जिम हिग्स, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ०४७२ – ॲंथेमियस, पश्चिम रोमन सम्राट.
- ०९३७ – रुडॉल्फ दुसरा, बरगंडीचा राजा.
- ११७४ – अमाल्रिक, जेरुसलेमचा राजा.

## : SMS :

Jab Koi Baat
Bigarr Jaye
Jab Koi Mushkil
Barh Jaye
To?
Hont Ghuma,
Seeti Baja,
Seeti Baja k Bol
Bhaiyya
ALL IS WEL

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा,शुभ दिशा:उत्तर हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा.

**तुळ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व आध्यात्मिक अंगीकारल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व प्रेम संबंधात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल.

**मिथुन :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल.

**मकर :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा: पूर्व आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल.

**सिंह :** शुभ रंग: पांढरा,शुभ दिशा: पूर्व व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :उत्तर आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा : उत्तर पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३ | २४.३ |
| अहमदनगर | ३२.५ | २३.९ |
| अकोला | ३७.१ | २६.५ |
| अमरावती | ३७.५ | २६.३ |
| बीड | ४१.२ | २९.८ |
| भंडारा | ३९.३ | २६.४ |
| बुलढाणा | २७.१ | २५.६ |
| चंद्रपूर | ४०.३ | ३०.६ |
| चेन्नई | ४२.१ | ३४ |
| नवी दिल्ली | ३१.५ | २५.९ |
| धुळे | ३८ | २६.९ |
| गोंदिया | ३८.१ | २६.१ |
| जळगाव | ३७.१ | २६.२ |
| कोल्हापूर | ३०.६ | २३.८ |
| लातूर | ३४.१ | २४.८ |
| मुंबई | ३६.६ | ३३.६ |
| नागपूर | ३८.९ | २६.६ |
| नांदेड | ३६.७ | २६.२ |
| नंदूरबार | ३४.७ | २६.१ |
| नाशिक | ३१.४ | २४.८ |
| पुणे | २९ | २३.२ |
| पंढरपूर | ३५.७ | २४.६ |
| सातारा | ३१.४ | २३.४ |
| सांगली | ३२.९ | २४.१ |
| सोलापूर | ३५.८ | २५.१ |
| वर्धा | ४०.१ | २६.८ |

## पंचांग

पंचांग
११ जुलै २०२६
शनिवार
विक्रम संवत्– २०८२
निज ज्येष्ठशके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– दक्षिणयन
मास– निज ज्येष्ठ
ऋतु– सौर वर्षा
कृष्ण पक्ष
तिथि:द्वादशी
२६:०४:३१+
नक्षत्र:कृत्तिका ११:०३:१८
योग:गण्ड २४:०४:५८+
करण:कौलव १५:४६:१८

करण:तैतिल
२६:०४:३१+
सूर्य:मिथुन
चन्द्र:वृषभ
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – मोहरम
तारीख – २५
विशेष
भागवत एकादशई
पारशी अस्पंदार्मद मासारंभ
तुळशीबन महाराज
पुण्यतिथी – महागांव
(यवतमाळ)
संत निवृत्तिनाथ पुण्यतिथी
विश्वजनसंख्या दिन

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पालखी सोहळ्यामध्ये आलेल्या वारकऱ्यांना राजगिरी लाडू वाटप

पुणे (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोबत आलेल्या वारकऱ्यांना वडगाव शेरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहर उपाध्यक्ष अभिजित मोहनभाई शहा यांच्या हस्ते सुमारे 2000 पाकीट राजगिरी लाडू आणि गुडदाणी वाटप करण्यात आले होते. यावेळी ॲड.विक्रम दौंडकर, वडगावशेरी विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष हर्षद जाधव, परेश कटारिया, सुजल शहा, सुरज शहा, राखी शहा, श्रीमती शोभा शहा, राहुल दौंडकर आदी उपस्थित होते.



### अक्षय कोठावळे मित्र परिवारातर्फे वारकरी बांधवांना झेंडू बाम वाटप

पुणे (दैनिक संध्या) : अक्षय कोठावळे मित्र परिवारातर्फे आषाढी वारी निमित्त वारकरी बांधवांना झेंडू बाम वाटप करण्यात आले . देशात राज्यात प्रसिद्ध असलेला पाय वारी सोहळा देशाच्या राज्याच्या कानाकोपऱ्यातून आपल्या लाडक्या विठुरायाला भेटण्यासाठी आषाढी एकादशीला लाखो वारकरी चालत हरी नामाचा घोष करत पंढरपूर येथे जातात. संपूर्ण वारी चालत असते. त्यामध्ये वृद्ध महिला तरुण यांचा सहभाग लक्षणीय असतो पायी चालत असल्यामुळे पाय अंग दुखते अशा परिस्थितीमध्ये एक सामाजिक बांधिलकी म्हणून एक सेवा म्हणून अक्षय कोठावळे मित्र परिवारातर्फे वारकरी बांधवांना 5001 झेंडू बाम वाटप करण्यात आले. आपले सर्व दुःख विसरून पुण्यनगरीतील नागरिक वारकरी बांधवांची सेवा करतात ते सेवा अन्नदानाच्या माध्यमातून तसेच औषधे असेल त्यांची राहायची सोय सोय असेल पुण्यनगरीतील नागरिक सेवा करतात. आमच्या छोट्याशा झेंडू बाम वाटप सेवेने फार काही फरक पडणार नाही परंतु एक सामाजिक बांधिलकी उत्तरदायित्व व एक समाजाची उपकाराचे फेड जाणीव आणि वारकऱ्यांवर असलेले प्रेम ही सेवा करण्याचा निर्णय घेतला.



### अखंड 12 तास कीर्तनमालेत लालमहालात वारकरी तल्लीन

■ शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी व सहयोगी संस्थांतर्फे सलग ८ नारदीय कीर्तनांचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : देवाचिये द्वारी उभा क्षणभरी... यांसारख्या ओव्यांचे अर्थ कीर्तनाद्वारे सांगण्यासोबतच ज्ञानोबा माऊली, तुकाराम च्या नामघोषाने शेकडो वारक-यांच्या उपस्थितीत ऐतिहासीक लालमहालाचा परिसर दुमदुमून गेला. ऊन पावसाची तमा न बाळगता विठुरायाच्या भेटीसाठी कित्येक मैल चालत जाणा-या वारक-यांच्या स्वागतासाठी पुण्यात सलग १२ तास अखंड कीर्तनमालेचे आयोजन करण्यात आले होते. कसबा पेठेतील लालमहाल येथे सलग ८ नारदीय कीर्तनांच्या कीर्तनमालेत समरसता आणि संतपरंपरेचे दर्शन घेण्याकरिता वारकरी भक्तांनी उत्स्फूर्तपणे गर्दी केली. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, संस्कार भारती पश्चिम प्रांत व पुणे पीपल्स को-ऑप. बँकेतर्फे वै.ह.भ.प. महाराष्ट्र शाहीर जंगम स्वामी यांच्या स्मरणार्थ सलग १२ तास अखंड कीर्तनमालेचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनमालेचे उद्घाटन लालमहालाचे सुरक्षारक्षक सोमनाथ भोंडे, अश्विनी ससाणे तसेच पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे स्वच्छता कर्मचारी सुनील भंडगे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी व गाथेचे पूजन करुन झाले. यावेळी आयोजक प्रबोधिनीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे, प्रा.संगीता मावळे, संस्कार भारतीचे पश्चिम प्रांत महामंत्री प्रशांत कुलकर्णी, पुणे पीपल्स बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड आदी उपस्थित होते. कीर्तनमालेत अनुक्रमे कीर्तनकार ह.भ.प. श्रेयस बडवे, विकास दिग्रसकर, प्रा. संगीता मावळे, महेश काणे, वासुदेव बुरसे, डॉ.चारुदत्त आफळे, शेखर व्यास, सुहास देशपांडे यांनी कीर्तन केले. संतपरंपरा, वारी तसेच भक्तीचे महत्व आणि महात्म्य कीर्तनकारांनी आपल्या कीर्तनातून सांगितले. उपेंद्र शितुत, केदार टिळेकर (तबला), पल्लवी पिळणकर, होनराज मावळे (संवादिनी) यांनी साथसंगत केली.

### 33 व्या गांधी दर्शन शिबीरात दिनांक 12 जुलै रोजी 2 व्याख्याने व 'मुक्ता' चित्रपट

पुणे (दैनिक संध्या) : पुण्याच्या गांधी भवन कोथरूड येथे रविवार दि. १२ जुलै २०२६ रोजी ३३ वे गांधी दर्शन शिबीर सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये 'वारकरी संप्रदाय आणि सद्यस्थिती' या विषयवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रवक्ते ह.भ.प. विकास लवांडे यांचे व्याख्यान होणार असून 'न्या. महादेव गोविंद रानडे व्यक्ती आणि कार्य' या विषयावर सुप्रसिद्ध लेखक आणि लोकप्रिय वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांचे व्याख्यान होणार आहे. यानंतर राष्ट्रीय पुरस्कार विजेता 'मुक्ता' हा मराठी चित्रपट दाखवला जाईल. प्रख्यात दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल याचे दिग्दर्शन असून संजय पवार या चित्रपटाचे लेखक आहेत. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांनी संयुक्तपणे याचे आयोजन केले आहे अशी माहिती महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांनी दिली. हे शिबीर सर्वांसाठी विनामूल्य असून सर्वांनी आवर्जून यावे असे आवाहन त्यांनी केले आहे. या विनामूल्य शिबीरासाठी नोंदणी सुरज कुलकर्णी - 9326882000, तेजस भालेराव (संघटक, युक्रांद पुणे शहर) - 9172487019 आणि गणेश गाढवे (समन्वयक, गांधी दर्शन शिबीर) – 9657949574.

# वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंग परमात्म्याचीच सेवा

## मुरलीधर मोहोळ यांचे प्रतिपादन; वारकऱ्यांसाठी फिरता दवाखाना उपक्रमाचा शुभारंभ

पुणे (दै. संध्या)

■ 'सिंबायोसिस' व सौ शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्टतर्फे वारकऱ्यांसाठी २६ वर्षांपासून उपक्रम



"आषाढी वारी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक व वैभवशाली परंपरा आहे. श्रीक्षेत्र देहू व आळंदी येथून लाखो वारकरी ज्ञानोबा-तुकोबाची पालखी खांद्यावर घेऊन विठूनामाचा गजर करत पंढरपूरच्या वाटेवर चालत आहेत. पायी वारीत चालून थकलेल्या, शिणलेल्या या वारकऱ्यांची सेवा म्हणजे साक्षात पांडुरंगाची सेवा असून, हे पुण्याचे काम आपल्या हातून होतेय, याचे समाधान आहे," असे प्रतिपादन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतुक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ आणि सौ. शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी पंढरपूर प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने 'फिरता वारकरी दवाखाना' या उपक्रमाचे उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झाले. सेनापती बापट रस्त्यावरील सिम्बायोसिस भवनात झालेल्या कार्यक्रमावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, महापालिकेतील विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम, ॲड. अविनाश साळवे, 'सिंबायोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, माजी आमदार उल्हास पवार, मोहन जोशी, 'सिम्बायोसिस'चे डॉ. राजीव येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण, अधिष्ठाता डॉ. शशीधर उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, "भक्तिमय वातावरणात पालखी सोहळ्याला सुरुवात झाली असून, राज्यभरातून लाखो वारकरी या वारीत चालतात. पुण्यातील अनेक संस्था आपापल्या परीने वारकऱ्यांच्या सेवेसाठी झटत असतात. विठुरायाच्या भेटीसाठी ऊन-वारा, पाऊस, तहान-भूक विसरून निघालेल्या या वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी घेतलेला हा ज्ञानदानाच्या पलीकडे जाऊन सामाजिक भान जपणारा आहे."

मंजुषा नागपुरे म्हणाल्या, "गेल्या २६ वर्षांपासून अविरतपणे सकारात्मक ऊर्जा देणारा हा उपक्रम स्तुत्य आहे. वारकरी सेवेचे हे व्रत इतरांसाठीही प्रेरक आहे. वारकऱ्यांचे दुःख हलके करण्याचे, त्यांना वारीत चालताना अडचणी येऊ नयेत, यासाठी औषधे व आरोग्य सेवा देतानाच आपल्या हातून पांडुरंगाची सेवा घडत आहे. पालिकेच्या वतीनेही वारकऱ्यांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत." डॉ. शां. ब. मुजुमदार म्हणाले, "राज्यभरातून वारकरी आळंदी व देहूमध्ये दाखल झाले आहेत. पंढरीच्या दिशेने चालताना त्यांची सेवा करण्याची संधी हा पांडुरंगाचा आशीर्वाद आहे. परदेशातून, परप्रांतातून आलेल्या विद्यार्थ्यांना हा अनुभव समृद्ध करणारा असतो. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक दृष्टीकोन विकसित होण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अतिशय महत्वाचा वाटतो."

प्रास्ताविकात ॲड. अविनाश साळवे म्हणाले, "संतसेवेचा हा उपक्रम २००१ मध्ये एक ॲम्ब्युलंसपासून सुरु केला. यंदा १० सुसज्ज मोठ्या ॲम्ब्युलंस, दुचाकी ॲम्ब्युलंस व ३०० हुन अधिक डॉक्टर्स, नर्स आणि स्वयंसेवकांची टीम वेदनाशामक गोळ्या, औषधे, प्रथमोपचार यासह तातडीची आरोग्य सेवा व आपत्कालीन सेवेसाठी सज्ज असते. ही वारकरी आरोग्य सेवा अव्याहतपणे शेकडो वर्ष चालेल, असा विश्वास देतो."

उल्हासदादा पवार म्हणाले, "वारी हा विचार, विवेक व वैराग्य याचा त्रिवेणी संगम आहे. या संगमात चालणाऱ्या वारकऱ्यांची सेवा ईश्वरभक्तीची अनुभूती देते. हे पुण्याचे काम या दोन्ही संस्था सद्भावना आणि मानवतेचा विचार जपत एकत्रितपणे गेली २६ वर्षे करत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे."

डॉ. विद्या येरवडेकर यांनी सांगितले की, वारी ही स्वयंनियोजित, स्वयंशिस्तीने चालणारी परंपरा आहे. विद्यार्थ्यांनी या वारीमध्ये सहभागी व्हावेच; पण यावर संशोधनही करावे. व्यवस्थापन, नियोजन, स्वच्छता, सामाजिक समरसता या वारीमध्ये अनुभवायला मिळते. वारकरी संप्रदायाच्या सेवेसाठी आरोग्य सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास नवलकिशोर राम यांनी व्यक्त केला. रेवती पाठक यांनी सूत्रसंचालन केले. सुधीर दरोडे यांनी आभार मानले.

## १५० अनुसूचित जातीच्या तरुणांना कौशल्य विकास प्रमाणपत्रे

पुणे (दै. संध्या)



अनुसूचित जातीच्या तरुणांना रोजगारक्षम बनवून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क (एसटीपी), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने साताऱ्यात कौशल्य विकास प्रमाणपत्र वितरण व यशोगाथा कार्यक्रम उत्साहात पार पडला. तंत्रज्ञानाधारित विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या महाराष्ट्रातील १५० अनुसूचित जातीच्या तरुणांना यावेळी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. पोवई नाका येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (वायसीआयएस) परिसरातील कर्मवीर भाऊराव पाटील रिसर्च फाऊंडेशनच्या सी-थ्री-आय (CIII) इमारतीतील अत्याधुनिक इनक्युबेशन केंद्रात हा कार्यक्रम झाला. 'बार्टी'च्या महासंचालिका दीपा मुधोळ-मुंडे (आयएएस) आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

## "वारकऱ्यांच्या सेवेत Esvee Team ची विठ्ठलभक्ती"

### विजय वाघमारे व शिल्पा जयमनी यांच्या नेतृत्वाखाली अनोखा सेवायज्ञ

पुणे (दै. संध्या)



आषाढी वारी ही केवळ परंपरा नसून भक्ती, समर्पण आणि माणुसकीचा उत्सव आहे. याच सेवाभावातून Esvee Hair Studio & Academy चे संस्थापक विजय वाघमारे व शिल्पा जयमनी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण Esvee Team ने वारकरी बांधवांसाठी हृदयस्पर्शी सेवा उपक्रम राबविला.

एरंडवणे येथील श्रीमती अनुसयाबाई खिलारे मॉडेल स्कूल येथे संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम माऊली यांच्या दिंडींचा मुक्काम असताना, तेथे आलेल्या हजारो वारकऱ्यांसाठी मोफत हेअर कट, दाढी सेवा, फूट मसाज तसेच यंदा प्रथमच फुल बॉडी मसाज या विशेष सेवेचे आयोजन करण्यात आले.

अनेक किलोमीटरचा पायी प्रवास करून आलेल्या वारकऱ्यांचे थकलेले पाय, श्रमाने दमलेले शरीर आणि चेहऱ्यावरचा थकवा दूर करण्यासाठी Esvee Team चे सदस्य दिवसभर सेवेत तत्पर होते. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा उमटलेले समाधानाचे हास्य आणि त्यांच्या डोळ्यांतील कृतज्ञतेचे भाव हेच या सेवाकार्यातील सर्वात मोठे यश ठरले. विजय वाघमारे आणि शिल्पा जयमनी हे गेल्या अनेक वर्षांपासून कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता वारकऱ्यांची सेवा करत आहेत. "व्यवसायाबरोबर समाजसेवाही तितकीच महत्त्वाची" या विचारातून सुरू झालेला हा उपक्रम आज अनेकांसाठी प्रेरणास्थान बनला आहे.

यंदा प्रथमच सुरू करण्यात आलेल्या फुल बॉडी मसाज सेवेने वारकऱ्यांना विशेष दिलासा मिळाला. अनेक वारकऱ्यांनी "ही सेवा म्हणजे साक्षात विठ्ठलाची कृपाच" अशा भावना व्यक्त करत Esvee Team चे मनापासून आभार मानले.

"वारकऱ्यांची सेवा म्हणजेच विठ्ठलाची सेवा" या भावनेने प्रेरित होऊन कार्य करणारे Esvee Hair Studio & Academy, संस्थापक विजय वाघमारे, शिल्पा जयमनी आणि संपूर्ण Esvee Team यांनी माणुसकी, सेवाभाव आणि विठ्ठलभक्तीचा एक सुंदर आदर्श समाजासमोर उभा केला आहे.

## शुभम आव्हाळे ठरला 'साहित्य केसरी महाकाव्य करंडक २०२६'चा विजेता

### शाई प्रतिष्ठान आयोजित महाकाव्य स्पर्धेत शब्दांची बरसात; मिलिंद चन्ने 'रंगकेसरी नाट्यगौरव पुरस्कार २०२६' प्रदान

पुणे (दै. संध्या)



शाई प्रतिष्ठानतर्फे आयोजित राज्यस्तरीय 'साहित्य केसरी महाकाव्य करंडक २०२६' ही मानाची काव्यस्पर्धा नुकतीच नवी पेठ येथील पत्रकार भवन येथे उत्साहात पार पडली. राज्यभरातील २१५ कवींपैकी निवड झालेल्या ५४ कवींनी अंतिम फेरीत आपल्या कवितांचे सादरीकरण केले. यामध्ये पुण्याच्या शुभम आव्हाळे यांच्या 'पावसा येऊन जा' या कवितेने प्रथम क्रमांक पटकावत यंदाचा 'साहित्य केसरी महाकाव्य करंडक' पटकाविला, अशी माहिती शाई प्रतिष्ठानचे प्रसिद्धी प्रमुख निखील सुक्रे यांनी दिली.

कुस्तीतील 'महाराष्ट्र केसरी'च्या धर्तीवर काव्यक्षेत्रात मानाचे स्थान मिळविलेल्या या स्पर्धेचे यंदाचे सलग चौथे वर्ष होते. 'इथे फक्त कविता जिंकते' या घोषवाक्याखाली झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कवींनी सामाजिक, भावनिक आणि समकालीन विषयांवरील कविता सादर केल्या. या सोहळ्यात सुप्रसिद्ध अभिनेते मिलिंद चन्ने यांना 'रंगकेसरी नाट्यगौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

स्पर्धेत सांगलीच्या भाग्यलक्ष्मी बाळू क्षिरसागर यांनी 'आई तुझंच नाव लावावं म्हणते' या कवितेसह द्वितीय, तर वर्ध्याच्या प्रीती वानखेडे यांनी 'तुळस' या कवितेसह तृतीय क्रमांक मिळविला. यवतमाळचे निलेश तुरके (तुझी याद) आणि संभाजीनगरचे संदीप भिंगीकर (व्याकुळ प्रजा) यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले. गडचिरोलीच्या शरावती किशोर यांच्या 'यशोधरा' या कवितेला विशेष लक्षवेधी पुरस्कार मिळाला, तर नांदेडचे मंगेश कवटीकवार यांना 'पीपल्स चॉईस अवॉर्ड' प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला पाठ्यपुस्तकातील कवी हनुमंत चांदगुडे, प्रसिद्ध व्याख्याते स्वप्नील चौधरी, प्रा. अमोल चीने, कवी सागर काकडे, लेखक शरद तांदळे, युवा वक्ते अक्षय इळके, व्याख्याते ज्ञानराज पांचाळ आणि उद्योगपती नागेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

'साहित्यकेसरी' हा केवळ पुरस्कार नसून कवीच्या प्रतिभेचा सन्मान आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील प्रतिभावंतांना हे व्यासपीठ प्रेरणा देत आहे, असे विनायक पवार यांनी नमूद केले.

## 'दगडूशेठ' तर्फे २७ हजार वारकऱ्यांची आरोग्य व नेत्र तपासणी

पुणे (दै. संध्या)

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगिकारुन कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे वारक-यांसाठी आयोजित आरोग्य व नेत्र तपासणी शिबीरात २७ हजार ५६४ हून अधिक वारक-यांची तपासणी करण्यात आली. तसेच मंदिर परिसरात तब्बल २५ हजार वारक-यांना सकाळचा नाश्ता व चहा देखील देण्यात आला. आरोग्य शिबीर प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे, राजाभाऊ पायमोडे, राजाभाऊ घोडके, राजाभाऊ सूर्यवंशी, रुणाल केसरकर, प्रदीप ढवळे, मनोज वाळुंजकर, सुनील जाधव, विजय कोंढाळकर, ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी तसेच सुवर्णयुग तरुण मंडळ आणि सुवर्णयुग सहकारी बँकेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत ट्रस्टच्या आरोग्यसेवेच्या कार्यात वारक-यांसाठी आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर हा एक भाग आहे.

# शाश्वत आर्थिक विकासासाठी व्यापक इनोव्हेशन गरजेचे : विवेक सावंत

## ज्ञानप्रबोधिनीच्या अटल सामाजिक नवोन्मेष केंद्राचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)



"देशाचा शाश्वत आर्थिक विकास साधायचा असेल, तर इनोव्हेशन केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित न राहता समाजाभिमुख, सर्वसमावेशक आणि व्यापक व्हायला हवे. ग्रामीण भाग, महिला, स्वयं-सहाय्यता गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि तळागाळातील उद्योजकांना सक्षम करणारी नवोन्मेषाची परिसंस्था उभारणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडचे (एमकेसीएल) संस्थापक संचालक विवेक सावंत यांनी केले. नीती आयोग, अटल इनोव्हेशन मिशन, देसाई ब्रदर्स लिमिटेड आणि ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने उभारलेल्या ज्ञान प्रबोधिनीच्या अटल सामाजिक नवोन्मेष केंद्राचे (एसीआयसी) उद्घाटन विवेक सावंत यांच्या हस्ते झाले. प्रसंगी अटल इनोव्हेशन मिशनचे अधिकारी आशिष पांडे व दीपाक्षी जिंदल, देसाई ब्रदर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश पारेख, सीएसआर हेड डॉ. चंद्रकांत रावळ, ज्ञान प्रबोधिनीचे विश्वस्त सुभाष देशपांडे, निगडी केंद्राचे प्रमुख मनोज देवळेकर, 'एसीआयसी'चे संस्थापक संचालक यशवंत लिमये व संगीता कुलकर्णी, मुख्य नवोपक्रम अधिकारी ॐकार गुर्जर आदी उपस्थित होते.

विवेक सावंत म्हणाले, "भारताची लोकसंख्या, कौशल्य आणि स्थानिक समस्यांचे स्वरूप पाहता सामाजिक नवोन्मेषाला मोठी संधी आहे. समाजाचे प्रश्न सोडवण्यावर भर देताना त्यातून नाविन्यपूर्ण उपाय कसे शोधता येतील, यावर संशोधन व्हायला हवे. शिक्षण, उद्योग, संशोधन संस्था आणि समाज यांनी एकत्रितपणे काम केल्यास रोजगारनिर्मिती, उद्योजकता आणि शाश्वत विकासाला गती मिळेल.

तंत्रज्ञानाचा वापर समाजातील प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्यासाठी झाला, तर त्याचा व्यापक परिणाम देशाच्या आर्थिक प्रगतीवर होईल." आशिष पांडे म्हणाले, "ज्ञान प्रबोधिनी हे अटल सामाजिक नवोन्मेष केंद्र (एसीआयसी) सुरू करणारे पुण्यातील पहिले केंद्र आहे.

देशभरात अटल इनोव्हेशन मिशनअंतर्गत सुमारे २५ एसीआयसी केंद्रे कार्यरत असून, त्यापैकी हे केंद्र ग्रामीण आणि तळागाळातील समाजघटकांवर विशेष लक्ष केंद्रित करणार आहे. ज्ञान प्रबोधिनीचे शेतकरी, महिला बचत गट, ग्रामीण नागरिक आणि स्थानिक उद्योजक यांच्याशी आधीपासूनच मजबूत जाळे असल्याने हे केंद्र योग्य ठिकाणी उभारल्याचे समाधान आहे.

या केंद्राला देशातील सर्वोत्तम सामाजिक नवोन्मेष केंद्र बनविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जे. जे. रुग्णालयातील ICU बेड्स वाढविण्यासाठी महत्त्वाचा निर्णय

■ विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील सर्वात मोठ्या शासकीय रुग्णालयांपैकी एक असलेल्या जे. जे. रुग्णालयातील गंभीर रुग्णांना अधिक प्रभावी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील अध्यक्षांच्या दालनात झालेल्या बैठकीत जे. जे. रुग्णालयातील ICU बेड्सची संख्या वाढविण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला. "जे. जे. रुग्णालयात ICU बेड्सची संख्या अपुरी पडत असल्याने रुग्णालयातील कार्यरत रक्तपेढीची जागा ICU विभागासाठी उपलब्ध करून देण्याबाबत" या विषयावर संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत जे. जे. रुग्णालयात ICU बेड्सची कमतरता असल्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना वेळेवर अतिदक्षता विभागात दाखल करणे शक्य होत नसल्याची बाब निदर्शनास आली. यावर उपाय म्हणून रुग्णालयातील सध्याच्या रक्तपेढीची जागा ICU विभागासाठी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव विचारात घेण्यात आला. या निर्णयामुळे ICU बेड्सची संख्या वाढण्यास मदत होणार असून गंभीर रुग्णांना तात्काळ अतिदक्षता विभागात दाखल करून आवश्यक उपचार उपलब्ध करून देता येणार आहेत. तसेच रुग्णसेवेची गुणवत्ता अधिक उंचावण्यास आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मोठी मदत होणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. यावेळी संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ICU विभागाच्या विस्तारासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

### सासवड एसटीस्थानक परिसरात वृक्षारोपण मोहीम राबवणार - वृषाली तांबे

जेजुरी (दैनिक संध्या) : राज्य परिवहन महामंडळाने एस टी च्या ७८ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्व स्थानकाच्या आवारात ७८ हजार झाडे लावण्याचा संकल्प सोडला आहे. त्या अनुषंगाने येत्या १४ जुलै नंतर सासवड एस टी स्थानक व परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती नव्यानेच कार्यभार घेतलेल्या सासवड आगार प्रमुख वृषाली तांबे यांनी दिली. या मोहिमेत शहरातील नागरिक, नगर पालिका प्रशासन व स्वयंसेवी संस्थांनी सहभागी व्हावे असे आवाहनही तांबे यांनी केले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपानदेव महाराज व चांगा वटेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा सासवड येथून मार्गस्थ होत आहे त्या पार्शवभूमीवर सासवड आगाराने भाविकांसाठी जादा बसेसचे नियोजन केले आहे अशी माहिती तांबे यांनी दिली. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला जाण्यासाठी किमान चाळीस प्रवाशांनी तयारी दर्शवली तर त्या गावातून स्वतंत्र बस उपलब्ध केली जाईल व एस टी च्या सध्या असणाऱ्या सर्व सवलती देखील दिल्या जातील असे सांगत या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहनही आगार प्रमुख वृषाली तांबे यांनी केले आहे सहाय्यक वाहतूक निरीक्षक सुनील येळे, वाहतूक नियंत्रक कैलास जगताप, पोपट जैनक, प्रवीण गायकवाड यावेळी उपस्थित होते.स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले, कार्याध्यक्ष जीवन कड,सचिव गणेश मुळीक यांनी या प्रसंगी नव्याने रुजू झालेल्या वृषाली तांबे यांचे स्वागत करत त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

### वैद्यकीय अधिकाऱ्यांवर 'सैनिक आणि डॉक्टर' अशी दुहेरी जबाबदारी

पुणे (दैनिक संध्या) : 'डॉक्टर म्हणून रुग्णांवर उपचार करणे आणि सैनिक म्हणून राष्ट्रसेवेसाठी सदैव सज्ज राहणे, ही दुहेरी जबाबदारी आता तुमच्या खांद्यावर आहे. डॉक्टरचा पांढरा कोट आणि भारतीय सशस्त्र दलाचा गणवेश ही जगातील सर्वाधिक सन्मानाची दोन प्रतीके परिधान करण्याचा बहुमान तुम्हाला मिळाला आहे. त्यामुळे व्यावसायिक कौशल्य, शिस्त, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि सेवाभाव जपत राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्या,' असे आवाहन 'सशस्त्र दल वैद्यकीय सेवे'च्या (एएफएमएस) महासंचालक सर्जन व्हाइस ॲडमिरल आरती सरीन यांनी केले.

# बदला अभी बाकी है, पूर्वांचल भुला नहीं!

■ बदला अजून बाकी आहे, पूर्वांचल विसरलेला नाही!

■ ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर रक्तांचलचा मनोवेधक सीझन 3 ट्रेलर प्रसिद्ध

■ रक्तांचल सीझन 3 चे प्रसारण 16 जुलैपासून मोफत खास ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर




मुंबई (दै. संध्या) :

ॲमेझॉन एमएक्स प्लेयर, भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज रक्तांचल सीझन 3 च्या लक्षवेधी ट्रेलरचे अनावरण केले. या ट्रेलरने आतापर्यंतच्या प्रेक्षक-पसंतीच्या गुन्हेगारी फ्रँचायझीच्या सर्वात गुंतवणूक ठेवणाऱ्या सीझनची निर्मिती केली आहे. रितम श्रीवास्तव दिग्दर्शित, सिद्धार्थ मिश्रा लिखित आणि जार मोशन पिक्चर्स निर्मित, आगामी सीझनमध्ये क्रांती प्रकाश झा, निकितिन धीर, करण पटेल, माही गिल, राजेश कुमार आणि विक्रम कोचर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पूर्वांचलच्या खडतर पार्श्वभूमीवर घडणाऱ्या नवीन सीझनमध्ये सूड, महत्त्वाकांक्षा, नाजूक युती आणि कट्टर विश्वासघाताचे वर्चस्व असलेल्या जगाचा सखोल वेध घेतला आहे. जिथे प्रत्येक निर्णयाला किंमत मोजावी लागते. रक्तांचलचा तिसरा सीझन दिनांक 16 जुलैपासून केवळ ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर स्ट्रीम होईल.

ॲक्शन-पॅक ट्रेलरने फ्रँचायझीच्या आतापर्यंतच्या सर्वात भयंकर अध्यायाचे दरवाजे उघडले आहेत. पळापळीत चार वर्षे घालवल्यानंतर, विजय सिंग आपला हाडाचा वैरी असलेल्या वसिम खानशी सूड उगवण्याच्या एकाच उद्देशाने गडद सावलीतून बाहेर येतो. वर्षानुवर्षे सुरू असलेल्या शत्रुत्वाचे सर्वसमावेशक युद्धात रूपांतर होत असताना, हा संघर्ष केवळ विजय सिंग आणि वसिम खान यांच्यापेक्षा खूप मोठा होत जातो. सांकी पांडे पुन्हा रिंगणात उतरतात, तर सरस्वती देवी केंद्रस्थानी असतात. विरेंद्र प्रताप सिंग तसेच हिमांशू पटनायक यांच्या आगमनाने सत्तेचे संतुलन बदलत असल्याने राजकीय पटल अधिकाधिक अस्थिर होत जाते. स्पर्धा तीव्र स्वरूप धारण करताना राजकीय समीकरणे एकमेकांशी गुंतू लागतात, ट्रेलरमध्ये एक खिळवून ठेवणारी लढाई दिसते. जिथे प्रत्येक चाल महत्त्वाची असते आणि संघर्ष त्याच्या सर्वोच्च निर्णायक टप्प्यावर पोहोचतो.

विजय सिंग'चे विश्व पुन्हा आकाराला आणण्याबद्दल विचार मांडताना क्रांती प्रकाश झा म्हणाले, "विजय सिंग नेहमीच धैर्य आणि दृढनिश्चयाने प्रेरित राहिला आहे. इतक्या वर्षांनंतर ती भूमिका पुन्हा साकारण्यासाठी परतणे परिचित आणि रोमांचक दोन्ही वाटले. या सीझनमध्ये त्याला अशा परिस्थितीत ठेवले जाते जे सतत त्याच्या संकल्पाची कसोटी घेतात. ज्यामुळे प्रत्येक संघर्ष शेवटच्या संघर्षापेक्षा अधिक तीव्र होतो. फ्रँचायझीमध्ये यापूर्वी दाखवलेल्या सर्वात मोठ्या प्रदर्शनाच्या दिशेने तयार होणाऱ्या रोमांचक प्रवासाची चाहते अपेक्षा करू शकतात."

वसिम खानच्या भूमिकेत परतणाऱ्या निकितिन धीरने आपले विचार मांडताना सांगितले, "पुन्हा एकदा वसिम खान साकारण्याची संधी अतिशय समाधानकारक म्हणावी लागेल. कारण या व्यक्तिरेखेला अनेक पदर आहेत. वास्तविक त्याचे (वसिमचे) जिथे पाऊल पडते, तिथे वर्चस्व गाजविण्यात तो यशस्वी ठरल्याचे प्रेक्षक अजूनपर्यंत पाहत आले आहेत. मात्र या सीझनमध्ये त्याच्यासमोर न चुकवता येणारी आव्हाने उभी राहतील. प्रेक्षकांनी आजवर जे वैर अनुभवले, ते या सीझनमध्ये पूर्णपणे नव्या ढंगात टिपेला पोहोचलेले दिसेल आणि त्यांच्यासमोर उलगडणाऱ्या प्रत्येक क्षणाची ते मजा घेतील, असं मला वाटते."

सूड उगविण्याची प्रत्येक चाल आणि शक्ती हेच अंतीम धन्यता बनत असताना, रक्तांचल सीझन 3 फ्रँचायझीला त्याच्या आतापर्यंतच्या सर्वात स्फोटक अध्यायात उभे करते. क्यूंकी बदला अभी बाकी है... विजय और वसिम की इस जंग में बचेगा सिर्फ एक! (कारण सूड उगवायचा राहून गेलाय.. विजय आणि वसिमच्या लढाईत वाचेल कोणीतरी एकच!)

रक्तांचलचा 3 सीझन दिनांक 16 जुलैपासून केवळ ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य स्ट्रीम होईल, जो मोबाईल उपकरणे, कनेक्टेड टीव्ही, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही, जिओटीव्ही आणि एअरटेल एक्सस्ट्रीमवर उपलब्ध असेल.

## सुवर्णा राक्षे यांच्या राजीनाम्यानंतर उपनगराध्यक्ष पदासाठी इच्छुकांची जोरदार फील्डिंग

चाकण (दै. संध्या) :

चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा शामराव राक्षे यांनी आपल्या पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला आहे. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी सुवर्णा राक्षे यांचा उपनगराध्यक्ष पदाचा राजीनामा स्वीकारला आहे. राक्षे यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले आहे. त्यामुळे या पदावर कोणाला संधी मिळणार, याकडे चाकणकरांचे लक्ष लागले आहे. चाकण नगरपरिषदेवर शिवसेना शिंदे गटाचे वर्चस्व असून, खेडचे माजी आमदार



स्व. सुरेशभाऊ गोरे यांच्या पत्नी मनीषा गोरे ह्या चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आहेत. गोरे व राक्षे या शिवसेना शिंदे गटाच्या असून, राक्षे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. चाकण नगरपरिषद अस्तित्वात आल्यानंतर दुसऱ्यांदा पंचवार्षिक निवडणूक होऊन चाकण नगरपरिषदेवर जानेवारी महिन्यात नव्याने कार्यकारी मंडळ अस्तित्वात आले आहे.

## श्री रेडा समाधी पालखी सोहळ्याचे पंढरपूरकडे मोठ्या उत्साहात प्रस्थान

नारायणगाव (दै. संध्या) :



संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी ज्या रेड्यामुखी वेद बोलवून घेतले, त्या पावन क्षेत्रावरून म्हणजेच आळेफाटा येथील श्री रेडा समाधी मंदिरातून पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखी सोहळ्याचे बुधवारी मोठ्या उत्साहात प्रस्थान झाले. या प्रस्थान सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर विठ्ठल नामाच्या जयघोषाने आणि भक्तीरसाने न्हाऊन निघाला होता. पालखी प्रस्थानापूर्वी शिवनेर भूषण राजाराम महाराज जाधव, ह.भ.प. सुदाम महाराज बनकर, जेजुरी येथील मल्हारी मार्तंड खंडोबा देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष तुषार सहाने, जिल्हाधिकारी कार्यालयाचे माजी सचिव अजित कुऱ्हाडे व सरपंच मुकुंद भंडलकर यांच्या हस्ते मंदिरात श्री माऊलींच्या प्रतिमेची आणि पालखीची विधिवत महापूजा करण्यात आली. त्यानंतर रामदास महाराज सहाणे यांच्याकडे वीणा सुपूर्त केली.

श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जीवन शिंदे, पालखी सोहळा अध्यक्ष म्हतू सहाने व कार्याध्यक्ष भागासाहेब शेळके यांच्या हस्ते दिंडीला शुभारंभ करण्यात आला. यावेळी देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष आनंद शिरतर, माजी पंचायत समिती सदस्य नेताजी डोके, व्यवस्थापक कान्हू कुऱ्हाडे, खजिनदार संजय गुंजाळ, माजी जिल्हा सदस्य प्रसन्न डोके, सचिव गणेश शेळके, माजी उपसभापती प्रीतम काळे,अरुण गुंजाळ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कपाळावर चंदनाचा टिळा, हाती भगव्या पताका आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला भाविकांमुळे वातावरणात एक वेगळाच उत्साह दिसून येत होता. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषात वारकरी पालखी सोहळ्यात सामील झाले.

यावर्षीच्या पालखी सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे, नेताजी डोके ,नयना डोके आणि रवींद्र गुंजाळ यांनी नवीन पालखी रथ उभारणीसाठी तब्बल ३ लाख २ हजार रुपयांची आर्थिक देणगी दिली.

## वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी झटणाऱ्या खाकीचा सन्मान



जेजुरी (दै. संध्या) :

निःस्वार्थ सेवेला कृतज्ञतेची सलामी देत स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठान, सासवड यांच्या वतीने पालखी बंदोबस्तावर कार्यरत असलेल्या २०० पोलीस बांधवांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. भर पावसात कर्तव्य बजावताना त्यांना थोडासा आधार आणि संरक्षण मिळावे, या भावनेतून पोलीस अधीक्षक संतोष घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त शनिवारी पालखीचे सासवडमध्ये आगमन होत असून, रविवारी संत सोपानकाका महाराज यांच्या पालखीचे सासवड येथून प्रस्थान होणार आहे. या पवित्र सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी सासवडमध्ये दाखल होत आहेत. वारकऱ्यांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था आणि पालखी सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी पोलीस, होमगार्ड आणि इतर सुरक्षा यंत्रणांतील अधिकारी व कर्मचारी अहोरात्र सेवेत कार्यरत आहेत.

यंदा पावसाने जोरदार हजेरी लावली असतानाही कर्तव्यावर असलेले पोलीस बांधव पावसाची तमा न बाळगता रस्त्यावर ठामपणे उभे राहून आपले दायित्व पार पाडत आहेत. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान टिकून राहावे, त्यांच्या वारीत कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी स्वतःच्या आराम आणि सोयींचा त्याग करून खाकी वर्दीतील हे सेवाव्रती अखंड कर्तव्य बजावत आहेत.

या उपक्रमासाठी गोपनीय विभागाचे रुपेश भगत यांनी प्रतिष्ठानकडे पाठपुरावा केला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप सदस्य माधव शिवरकर, एपीआय वैभव सोनवणे, पीएसआय अर्चना पाटील, पोलीस कॉन्स्टेबल सचिन किवळे, किरण तुपे, होमगार्ड तुषार पेटकर, श्रीकांत भंडलकर हे उपस्थित होते.

## वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप

चाकण (दै. संध्या) :




फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजतर्फे चाकण परिसरात कार्यरत असलेल्या वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर, कर्तव्यावर असताना वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि आरोग्य अबाधित राहावे, यासाठी रेनकोट प्रदान करण्यात आले. प्रतिकूल हवामानातही चाकण औद्योगिक परिसरातील कंपन्यांची वाहतूक सुरळीतपणे चालावी, यासाठी त्यांना मदत करणे हा या मागचा उद्देश असल्याचे फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप बटवाल यांनी सांगितले. फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज वाहतूक पोलिसांना नेहमीच सहकार्य करण्यासाठी कटिबद्ध असते.

## व्हिस्कासने भारतासाठी पहिल्यांदाच स्थानिक चवीवर आधारित नवे कॅट फूड सादर केले

नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह कॅट फूड ब्रँड व्हिस्कास® ने आज नवीन इंडियन फिश रेंज सादर केली. ही नवी रेंज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय आणि मोठ्या प्रमाणावर खाल्ल्या जाणाऱ्या रोहू आणि कतला या माशांपासून प्रेरित आहे. भारतीय घरांमध्ये परिचित असलेल्या माशांच्या चवीला व्हिस्कास® च्या विश्वासार्ह पोषणतज्ज्ञतेची जोड देत, या उत्पादनात व्हिस्कास® चे खास कुरकुरीत क्रीमी यम्मी पॉकेट्स ™ समाविष्ट करण्यात आले आहेत. हे कॅट फूड विशेषतः मांजरांसाठी तयार करण्यात आले असून, त्यातून 100 टक्के संपूर्ण आणि संतुलित पोषण मिळते. भारतीय पाळीव प्राणी पालकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले हे भारतातील या प्रकारचे पहिले नाविन्यपूर्ण उत्पादन आहे. ओम्निकॉम ॲडव्हर्टायझिंग इंडियाचा भाग असलेल्या 22फीट या संस्थेने या मोहिमेची संकल्पना तयार केली आहे. या मोहिमेत बॉलिवूड अभिनेत्री आणि मांजरप्रेमी मृणाल ठाकूर सहभागी झाली आहे. मांजरांसोबतचा तिचा वैयक्तिक अनुभव या मोहिमेला विश्वासार्हता आणि आपलेपणा




देतो. त्यामुळे व्हिस्कास® च्या या पहिल्या इंडियन फिश रेंजची ओळख करून देण्यासाठी ती योग्य चेहरा ठरली आहे.

भारतीय घरांमध्ये मासे हे विशेष स्थान असलेले अन्न आहे आणि अनेकजण आपल्या मांजरांनाही मासे खाऊ घालतात, या निरीक्षणावर आधारित व्हिस्कास® ने ही नवी मोहीम तयार केली आहे. या मोहिमेत एक महत्त्वाचा संदेश दिला आहे की, रोहू आणि कतला या माशांना भारतातील वेगवेगळ्या भागांत वेगवेगळी नावे असली तरी त्यांच्याबद्दलचे प्रेम सर्वत्र सारखेच आहे. मात्र, फक्त घरचे मासे खाऊ घातल्याने मांजरींना आवश्यक असलेले संपूर्ण पोषण नेहमी मिळेलच असे नाही. मांजरांच्या दैनंदिन गरजेनुसार आवश्यक असलेले प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे त्यातून सातत्याने मिळत नाहीत. याच गरजेला लक्षात घेऊन व्हिस्कास® ने भारतीय पाळीव प्राणी पालकांचा विश्वास असलेल्या माशांच्या चवीला आधुनिक पोषणशास्त्राची जोड देऊन, मांजरींसाठी 100% पूर्ण आणि संतुलित पोषण देणारे खाद्य तयार आहे. त्यामुळे पहिल्यांदाच मांजर पाळणाऱ्या भारतीय कुटुंबांना घरगुती अन्नाऐवजी वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेले आणि पौष्टिक कॅट फूड निवडण्याचा विश्वासार्ह पर्याय उपलब्ध झाला आहे. या जाहिरात चित्रपटात अभिनेत्री आणि मांजरप्रेमी मृणाल ठाकूर झळकली आहे. विविध भारतीय भाषांचा वापर करून तयार केलेल्या या हलक्याफुलक्या कथेत, व्हिस्कास® कसे मांजरांसाठी रोजच्या माशांच्या आवडीला संपूर्ण आणि संतुलित पोषणात रूपांतरित करते, हे प्रभावीपणे दाखवण्यात आले आहे.

या मोहिमेची सुरुवात मुंबई आणि कोलकाता येथील समुद्रकिनाऱ्यालगतच्या प्रसिद्ध ठिकाणी मोठ्या टीझर उपक्रमाद्वारे करण्यात आली. या दोन्ही शहरांचा माशांशी असलेला जुना संबंध लक्षात घेऊन हा उपक्रम राबवण्यात आला.



## लोणी रेल्वे स्टेशन अंधाराच्या विळख्यात

### प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

लोणी काळभोर (दै. संध्या) :

लोणी काळभोर रेल्वे स्टेशन परिसरात प्रवेशद्वारा समोरील पथदिवे बंद असल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक ,नोकरदार आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अंधारात दिंनाक ०७/०७/२०२६ रोजी संध्याकाळी साप निघाल्याने प्रवाशांमध्ये भितीचे वातावरण पसरले . स्टेशनवर ये-जा करणाऱ्या प्रवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

संध्याकाळनंतर स्टेशन परिसरात पुरेसा प्रकाश नसल्याने , प्रवेशद्वार तसेच पार्किंग परिसरात अंधाराचे साम्राज्य दिसून येते. त्यामुळे पादचाऱ्यांना चालताना अडचण येत असून, अपघाताची शक्यता वाढली आहे. त्यातच साप निघाल्याने प्रवाशांमध्ये भिती पसरली व रेल्वे प्रशासना विरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला . तसेच अंधाराचा फायदा घेऊन चोरी, लुटमार किंवा इतर अनुचित प्रकार घडण्याची भीतीही प्रवासी व्यक्त करत होते .

दररोज हजारो प्रवासी या रेल्वे स्टेशनचा वापर करतात. मात्र मूलभूत सुविधांमध्ये येणाऱ्या या त्रुटीमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. तिकीट खिडकी जवळ सर्वत्र अस्वच्छता पसरली असुन .प्लॅटफॉर्म वरील टॉयलेट अस्वच्छतेने ग्रासले आहेत. याविषयी नागरिकानी संताप व्यक्त केला आहे. रेल्वे प्रशासन आणि संबंधित स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे पाहणी करून समस्या तातडीने सोडवावी, जेणेकरून प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुविधाजनक होईल असे प्रवाशांनी बोलुन दाखविले.

## आरोग्य शिबिर

पुणे (दै. संध्या) : आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी पाषाण परिसरात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण १२७ वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



## नावात बदल

माझे शाळेच्या दाखल्याप्रमाणे व लग्ना अगोदरचे नाव कांचन पंढरीनाथ बोंगाळे असून लग्नानंतरचे नाव वैष्णवी संजीवकुमार किंवा संजीव भाटे असे आहे.

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना**

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची/ नवीन कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T- 038/2026-27 ते T- 043/2026-27 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि. ११.०७.२०२६ ते १७.०७.२०२६ पर्यंत दुपारी १३:०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. १७.०७.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. १७.०७.२०२६ रोजी १५:३० वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील.

निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग, पुणे यांना भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६७८२४ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**PRO No. PRO/PZ/084/2026-27**

स्वा/-

कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, पुणे

महानिर्मिती — महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**इ-निविदा सूचना**

**क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/१४**

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००७०४१७ / डब्ल्युटीपी | स्थिर ब्लिचिंग पावडर (जी.आर.-१) ची खरेदी. | ३६,२२,५००/- / ३९,७५०/- |
| २. | ३००००७०४१५ / ईएम | व्हीआयपी लिफ्ट, बॉयलर हाऊस लिफ्ट आणि ॲडमिन बिल्डींग लिफ्टचे दैनंदिन संचलन व साफसफाई करण्यासाठी द्विवार्षिक कंत्राट. | ५२,०५,३८०/- / ५५,६००/- |
| ३. | ३००००७०४२१ / ओडीपी | युनिट ४ सीओएच दरम्यान बॉटम ॲश हॉपरसाठी S.S. सील प्लेट्स, 'Y' ॲंकर आणि वायर मेशचा पुरवठा. | ६,६१,७००/- / १०,१५०/- |
| ४. | ३००००६९२७४ / सीएचपी | कन्व्हेयर क्षेत्राखालील भागातून/सीएचपी मधिल कोठूनही दगड/शेल/कोळसा निर्दिष्ट ठिकाणी माल मशीनवर चढवणे आणि हलवण्याच्या/ वाहतुकीच्या कामासाठी करार. | २,०४,३२,०६५/- / २,०७,८२०/- |

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

थोडक्यात पण महत्वाचे...



## सर्व 10 प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजपच्या 'या' सदस्यांची लागणार वर्णी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजपाच्या नगरसदस्यांची निवड झाली आहे. आता १३ जुलै रोजी या निवडणूक निकालाची औपचारिक घोषणा होईल, अशी माहिती महानगरपालिका सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिली. प्रभाग समिती अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत आज दुपारी ३ ते सायंकाळी ५ ही होती. या काळात प्रत्येक प्रभागात १ याप्रमाणे भाजपकडून एकूण १० नगरसदस्यांनी अर्ज केले होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या दोन्ही पक्षाच्या एकाही नगरसदस्याने उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे सर्व प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजप नगरसदस्यांची निवड निश्चित झाली आहे. यामध्ये प्रभाग अ (राजगड) समिती अध्यक्षपदी अर्चना करांडे यांची, प्रभाग ब (सिंहगड) समिती अध्यक्षपदी मंदार देशपांडे, प्रभाग क (विजयदुर्ग) समिती अध्यक्षपदी निखिल बोऱ्हाडे, प्रभाग ड (देवगिरी) समिती अध्यक्षपदी सविता खुळे, प्रभाग इ (शिवनेरी) समिती अध्यक्षपदी अर्चना सस्ते, प्रभाग फ (तोरणा) समिती अध्यक्षपदी शिवानी नरळे, प्रभाग ग (पुरंदर) समिती अध्यक्षपदी मनिषा पवार, प्रभाग ह (प्रतापगड) समिती अध्यक्षपदी तृप्ती कांबळे, प्रभाग ज (रायगड) समिती अध्यक्षपदी आरती चोंधे आणि प्रभाग ल (लोहगड) समिती अध्यक्षपदी रेखा देवकर यांची निवड निश्चित झाली आहे, असे देखील पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले.

## बापरे ! कचऱ्याचा डोंगर 35 वर्षांपासून; कचरा एकाच ठिकाणी साचला

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराचा संपूर्ण कचरा मोशी कचरा डेपोत जमा होतो. पूर्वी दररोज 700 ते 800 मेट्रिक टन कचरा जमा होत होता. झपाट्याने वाढत असलेले शहर तसेच, वाढत्या लोकसंख्येमुळे कचराचे प्रमाणही वाढले आहे. सध्या दररोज तब्बल 1 हजार 400 ते 1 हजार 500 टन (टीपीडी) कचरा जमा होत आहे. परिणामी, डेपोतील गेल्या 35 वर्षांपासूनचे कचऱ्याचे डोंगर काही हटत नसून, वाढतच असल्याचे वास्तव आहे. त्यातून डेपोतील वेस्ट टू एनर्जी कार्यालयाची इमारत ढासळून कर्मचाऱ्यांचा नाहक बळी जात असल्याच्या घटना असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. महापालिकेच्या 81 एकर जागेत मोशी कचरा डेपो आहे. तेथे गेल्या 35 वर्षांपासून संपूर्ण शहराचा कचरा आणून टाकला जात आहे. झपाट्याने वाढत असलेल्या शहरामुळे कचराही वाढत आहे. सध्या दररोज 1 हजार 400 ते 1 हजार 500 टन कचरा जमा होत आहे. तीस लाख लोकसंख्येच्या शहरातील एक व्यक्ती दिवसाला सरासरी 407 ग्रॅम कचरा निर्माण करते. मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होत असल्याने मोशी डेपोत कचऱ्याचे मोठे मोठे उंच डोंगर तयार झाले आहेत. कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे मोशी परिसरातील रहिवाशी हैराण झाले आहेत. तसेच, कचऱ्यातून लिचड सांडपाणी वाहत असल्याने परिसरातील पाणी दूषित होत असल्याचा आरोप अनेक वर्षांपासून होत आहे.

## धीर सोडू नका; प्रशासन तुमच्या पाठीशी; डॉ. सूर्यवंशी यांनी साधला नातेवाईकांशी संवाद



पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी कचरा डेपो येथे घडलेल्या दुर्घटनेनंतर सुरू असलेल्या बचावकार्यादरम्यान महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी गुरुवार (दि. ९) घटनास्थळी इमारतीमध्ये अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. या कठीणप्रसंगी प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून इमारतीत अडकलेल्या व्यक्तींना सुखरूपपणे बाहेर काढण्यासाठी यंत्रणांचे अविरत प्रयत्न सुरू आहेत. बचावकार्य पूर्ण होईपर्यंत धीर धरा, यामध्ये निश्चितपणे अडकलेल्या व्यक्ती सुखरुपपणे बाहेर येतील, असा दिलासादेखील नातेवाईकांना त्यांनी दिला. या वेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नातेवाईकांना सुरू असलेल्या बचावकार्याची माहिती दिली. ते म्हणाले की, महापालिकेच्या सर्व यंत्रणा, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), भारतीय सेना, अग्निशमन विभाग, पोलिस प्रशासन तसेच इतर संबंधित यंत्रणा पूर्ण क्षमतेने आणि अत्यंत समन्वयाने बचावकार्य करत आहेत. ही वेळ अत्यंत महत्त्वाची असून प्रत्येक नागरिकाला सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली जात आहे. ते म्हणाले की, प्रशासन संपूर्ण ताकदीने युद्धपातळीवर काम करत आहे. उपलब्ध सर्व मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि तांत्रिक साधनांचा वापर करून शोध व बचाव मोहीम अखंडपणे सुरू आहे. तसेच प्रशासन तुमच्यासोबत आहे. घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींची माहिती आपल्यापर्यंत वेळोवेळी दिली जाईल, असेही त्यांनी नातेवाईकांना सांगितले. घटनास्थळी इमारतीमध्ये अडकलेल्या नागरिकांचे नातेवाईक थांबलेले आहेत. त्यांच्या भोजन, निवास आणि इतर सर्व आवश्यक सुविधा त्यांना पुरवा असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अँटनी अँड लारा कंपनीच्या व्यवस्थापनाला दिले. दरम्यान, एनडीआरएफचे सेकंड कमांड दीपक तिवारी यांनी बचावकार्याची तांत्रिक माहिती नातेवाईकांना दिली.

# प्रवेश मार्ग तयार करण्याच्या कामाला सुरुवात

पिंपरी (दै. संध्या)

मोशी कचरा डेपो येथे दुर्घटनाग्रस्त झालेल्या इमारतीभोवतालचा मोठ्या प्रमाणावर असलेला मलबा हटवून इमारतीत प्रवेश करण्याचा मार्ग तयार करण्याचे काम वेगाने सुरू आहे. अधिकची यंत्रसामग्री वापरून या कामाला गती देण्यात आली असून इमारतीत अडकलेल्या सुमारे ८ नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे.

सध्या इमारतीचा अस्थिर भाग स्थिर करण्याचे काम जलद गतीने सुरू आहे. शिवाय, इमारतीच्या बाजूचा मलबा हटविण्यासाठी जेसीबी, पोकलेन आणि डंपरचा वापर केला जात आहे. इमारतीत अडकलेल्या नागरिकांच्या जीविताची दक्षता घेऊन काळजीपूर्वक ही मोहीम हाताळली जात आहे.

घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विजयकुमार चौबे आणि एनडीआरएफचे कमांडंट प्रवीण धट्ट यांनी आतापर्यंत झालेल्या कामाची माहिती घेऊन पुढील बचावकार्याच्या रणनीतीवर चर्चा केली. अडकलेल्या नागरिकांना सुखरूपपणे कसे बाहेर काढता येईल याबद्दल प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती आणि इमारतीची सद्यस्थिती याचा सर्व बाजूने विचार करून रणनीती ठरवण्यात आली आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला. बचावकार्यासाठी आवश्यक सर्व साधनसामग्री आणि मशिनरी उपलब्ध ठेऊन मशिनरी कार्यरत आहेत. घटना घडून जवळपास ४५ तासांपेक्षा अधिक कालखंड झाला आहे. त्यामुळे जलद गतीने मोहीम राबवून इमारतीत अडकलेल्या नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्याचे उद्दीष्ट आहे. त्यासाठी सर्व यंत्रणांना तसे निर्देश दिले आहेत, असे आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले आहेत.

इमारतीच्या समोरील बाजूने प्रवेश करण्याचा मार्ग पूर्णपणे बंद झाला असून मागील बाजूने इमारतीत प्रवेश करण्यासाठी त्या ठिकाणचा मलबा हटवून सुरक्षित मार्ग तयार करण्याचे काम वेगाने सुरू आहे. या इमारतीत अडकलेल्या ज्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले आहे त्यांच्याकडून माहिती घेऊन आत अडकलेले नागरिक नेमके कोणत्या जागी अडकले आहेत त्या जागेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी मार्ग तयार करण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार बचावकार्याला गती देण्यात आली आहे, अशी माहिती एनडीआरएफचे कमांडंट प्रवीण धट्ट यांनी दिली आहे.



### प्रकाश आंबेडकर यांची घटनास्थळाला भेट

आज माजी खासदार प्रकाश आंबेडकर यांनीही दुर्घटनास्थळी भेट देऊन बचाव मोहिमेचा आढावा घेतला. त्यांनी महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडून दुर्घटना आणि सुरू असलेल्या बचावकार्याची सविस्तर माहिती घेतली. आत अडकलेल्या नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबवा असे ते म्हणाले. तसेच इमारतीत अडकलेल्या नातेवाईकांशी घटनास्थळी भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे तसेच महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### महापौर रवि लांडगे यांनी घटनास्थळी पाहणी करून साधला इमारतीत अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी संवाद

आज महापौर रवि लांडगे यांनी दुर्घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. दुर्घटनाग्रस्त इमारतीमध्ये अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी त्यांनी संवाद साधत त्यांना धीर दिला. सध्या सुरू असलेल्या बचावकार्याची माहिती देत, सर्व यंत्रणा समन्वयाने आणि अत्यंत दक्षतेने कार्यरत असून अडकलेल्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत सुरक्षितरीत्या पोहोचण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नातेवाईकांना सांगितले.

## बिल्डर्स, डेव्हलपर्स झाले मालामाल अन् शेतकरी सोसताहेत हाल

वडगाव मावळ (दै. संध्या)

गेल्या चार दिवसांत मावळ तालुक्यातील शहरी भागातच नव्हे, तर ग्रामीण भागातही मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून, काही ठिकाणी दरड कोसळण्याचे प्रकार घडले आहेत; परंतु याला पाऊस हेच एकमेव कारण नाही, तर बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांनी ओढ्या-नाल्यांचे नैसर्गिक प्रवाह बदलून स्वतःचा फायदा करून घेतला आणि याचा फटका सर्वसामान्य नागरिक व शेतकरी यांना बसल्याचे दिसते. गेल्या काही वर्षांत मावळ तालुक्यात प्रामुख्याने वडगाव मावळ, तळेगाव दाभाडे, सोमाटणे फाटा, कान्हे, जांभूळ, साते, कामशेत या मुंबई-पुणे महामार्गाच्या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग तसेच छोटे-मोठे गृहप्रकल्प उदयास आले आहेत. आंदर मावळच्या भागातही कवडीमोल भावाने डोंगर किंवा डोंगरपायथ्याच्या जागा घेऊन मोठ्या धनिकांनी त्याठिकाणी वाटेल तशा पद्धतीने जागा विकसित करून फार्म हाऊस किंवा प्लॉटिंग व्यवसाय सुरू केला आणि पैसे कमवले आहेत. अनधिकृतपणे केवळ स्वतःच्या फायद्याचा विचार करून पाहिजे तशी जागा विकसित करायची, ओढ्या-नाल्यांचा नैसर्गिक स्रोत बदलायचा, सुरुंग लावून डोंगर फोडायचे अशा प्रकरणामुळे संबंधित भागातील जागा ढिसूळ झाल्याने दरड कोसळण्यासारखे प्रकार बऱ्याच ठिकाणी घडल्याचे पाहायला मिळाले. तसेच, शहरी भागात किंवा शहरालगतच्या भागात सुरू असलेल्या छोट्या-मोठ्या गृहप्रकल्पाच्या कामामुळे पूरस्थिती निर्माण झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत.

## निगडीतील भक्ती-शक्ती उड्डाणपुलाला मोठे भगदाड

पिंपरी (दै. संध्या)

निगडी येथील भक्ती-शक्ती उड्डाणपुलाच्या गोलाकार भागात मुसळधार पावसानंतर मोठे भगदाड पडण्यात आले असून, यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन उड्डाणपुलाची दुरुस्ती करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केली आहे. महात्मा बसवेश्वर पुतळा ते अंकुश चौक निगडी ग्रेड सेपरेटर मार्गावरील वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरती बंद करण्यात यावी, तसेच पुलाची तांत्रिक तपासणी करून आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. सचिन काळभोर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,



### दुरुस्तीची मागणी, अन्यथा आंदोलनाचा इशारा

भक्ती-शक्ती उड्डाणपुलाचे बांधकाम सन २०१८ ते २०२० या कालावधीत सुमारे १४५ कोटी रुपये खर्च करून करण्यात आले होते. या प्रकल्पासाठी ठेकेदार कंपनीला १८ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. मात्र, त्यानंतर सहा महिन्यांची मुदतवाढही देण्यात आली होती. पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यापूर्वीही उड्डाणपुलावर अशाच प्रकारचे भगदाड पडल्याची घटना घडली होती. त्यावेळी संबंधित ठेकेदार कंपनीविरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही काळभोर यांनी केला आहे.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे पुन्हा एकदा पुलाच्या गोलाकार भागात भगदाड पडल्याचे समोर आले असून, भविष्यात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी पुलाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी आणि आवश्यक असल्यास तो धोकादायक घोषित करण्याचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशाराही सचिन काळभोर यांनी दिला आहे. प्रशासनाच्या भूमिकेकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## वारकऱ्यांसाठी ॲडव्होकेट्स बार असोसिएशनकडून फराळ वाटप

पिंपरी (दै. संध्या)

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने वारकऱ्यांसाठी फराळ वाटपाचा सेवाभावी उपक्रम उत्साहात पार पडला. प्राधिकरण, निगडी येथील अपर तहसीलदार कार्यालयाजवळ (पवळे ब्रिज परिसर) आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या हजारो वारकऱ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले.



महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा आणि वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाचा वारसा जपत पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनकडून दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येतो. यंदाही बार असोसिएशनच्या पदाधिकारी व सदस्यांनी स्वयंप्रेरणेने सहभाग घेत वारकऱ्यांचे स्वागत केले आणि फराळाचे वाटप केले. या सेवाभावी उपक्रमाला वारकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सातत्याने सहभाग घेणारी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन पुढील काळातही अशाच सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून समाजाशी असलेले नाते अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी आयोजकांनी सांगितले.

या उपक्रमाचे नियोजन व आयोजन बार असोसिएशनचे सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रिना मगदूम, माजी सचिव ॲड. धनंजय कोकणे, सदस्य ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. संकेत सरोदे यांनी केले व यावेळी ॲड. फारुख शेख, ॲड. विकास शर्मा, ॲड. शांताराम गायकवाड, ॲड. सचिन पाटील, ॲड. भूषण चिंचवडे यांच्यासह बार असोसिएशनचे अनेक पदाधिकारी, माजी पदाधिकारी, सदस्य आणि वकील बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी वारकऱ्यांची सेवा करत सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा संदेश दिला.

## ८ महिन्यांच्या बाळाला आणि पत्नीला फक्त त्यांच्याच भेटीची आस!

पिंपरी (दै. संध्या)

मोशी येथील कचरा डेपो परिसरात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेला काही तास उलटून गेले तरी, येथे असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत असलेले सुनील कोरके यांचा अद्यापही शोध लागलेला नाही. गेल्या सहा वर्षांपासून या ठिकाणी अत्यंत प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने आपले कर्तव्य बजावणारे सुनील कोरके या दुर्घटनेनंतर बेपत्ता झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मूळचे पंढरपूरजवळील करकंब येथील रहिवासी असलेले सुनील हे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आणि चांगल्या भविष्यासाठी चिंचवड येथे आपल्या लहानशा कुटुंबासह स्थायिक झाले होते. मात्र, एका क्षणात घडलेल्या या घटनेने त्यांच्या हसत्या-खेळत्या संसाराला मोठा धक्का दिला आहे. सुनील यांचे चुलत भाऊ चेतन कोरके यांनी त्यांच्या आयुष्यातील भावूक प्रवास सांगितला. सुनील यांचे आई-वडील आणि जुळा भाऊ पंढरपूरला राहतात, तर सुनील कामासाठी शहरात आले होते. अत्यंत मनमिळाऊ स्वभाव असलेल्या सुनील यांच्या लग्नाला १० वर्षे झाली होती. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नुकताच त्यांच्या घरात पाळणा हलला होता. त्यांच्या अवघ्या ८ महिन्यांच्या लहान बाळाच्या येण्याने संपूर्ण कुटुंबात आनंदाचे वातावरण होते.

## संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त भाजपकडून वारकऱ्यांची सेवा

पिंपरी (दै. संध्या)

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने निगडी बस स्टॉप येथे वारकरी बांधवांसाठी विविध सेवा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दोन ट्रक केळी, २५० किलो बुंदी लाडू, चहा-नाश्ता तसेच रेनकोट आणि छत्री वाटप करण्यात आले.



यावेळी आमदार शंकर जगताप, विधान परिषद सदस्य अमित गोरखे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बाप्पू) काटे, सचिन काळभोर, सदाशिव खाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या हजारो वारकरी बांधवांना भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून मोफत अन्नदान, वैद्यकीय मदत व औषधांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. याच प्रसंगी आमदार शंकर जगताप यांनी संत तुकाराम महाराज पालखी रथासाठी ११ हजार रुपयांची देणगी अर्पण केली. वारकऱ्यांच्या सेवेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे आयोजन भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केले होते. या कार्यक्रमाला रमजान सनदी, रफिक शेख, राजू शेख, अक्षय सावंत, सुधीर भोसले, पप्पू हतागळे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## शिक्षक शासकीय कामात व्यस्त

दापोडी (दै. संध्या) : राज्यात शैक्षणिक वर्ष नुकतेच सुरू झाले असताना शिक्षकांवर विविध शासकीय कामांचा वाढता भार पडू लागला आहे. परिणामी, विद्यार्थ्यांना नियमित आणि गुणवत्तापूर्ण अध्यापन देण्यापेक्षा शिक्षकांना प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अधिक वेळ द्यावा लागत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. याचा थेट परिणाम शाळांमधील अध्यापनावर होत असून, अनेक ठिकाणी वर्ग रिकामे राहत आहेत. तसेच पर्यायी व्यवस्था करताना मुख्याध्यापकांचीही मोठी कसरत होत आहे. निवडणूक प्रक्रिया, मतदार यादी विशेष पुनरावलोकन (एसआयआर), विविध सर्वेक्षणे, माहिती संकलन, ऑनलाइन नोंदी, जनजागृती मोहिमा तसेच इतर शासकीय कामांची जबाबदारी शिक्षकांवर सोपविण्यात येत आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा हेमंत डांगे युथ सोशल फाउंडेशनच्या वतीने गौरव

चिंचवड (दै. संध्या)

हेमंत डांगे युथ सोशल फाउंडेशन व सुवर्णयोग प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग क्र.१८, चिंचवडगाव परिसरातील इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करून त्यांना सन्मानचिन्हे व शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे यशाची परंपरा कायम ठेवावी, अशी अपेक्षा मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमाला नगरसेवक राहुल कलाटे, माजी महापौर नगरसेविका अपर्णा डोके, युवानेते अनिकेत प्रभु, जीवन विद्या मिशनचे बाळासाहेब मरळ, राजेश अवसरे, भगवान पाटील सर तसेच भाजप सरचिटणीस मधुकर बच्चे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



यावेळी हेमंत डांगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते, पालकांचा विश्वास अधिक दृढ होतो आणि शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होते. त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे नियोजन तुषार वराडे, निखिल गावडे, विशाल साळुंके, किरण पाटील, प्रज्योत पुजारी, प्रसाद दुधुसकर, यश कुदळे आणि आकाश पांचाळ यांनी केले. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# तीन आरोपींकडून तीन गावठी पिस्तुले; १५ जिवंत काडतुसे जप्त

यवत (दै. संध्या)

पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि यवत पोलीस ठाण्याने संयुक्त कारवाई करत भांडगाव परिसरातून तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून तीन अवैध गावठी पिस्तुले, १५ जिवंत काडतुसे आणि एक बलेनो चारचाकी वाहन असा एकूण ५ लाख ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा (कोल्हापूर परिक्षेत्र) यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणारे व त्यांचा वापर करून गुन्हे करणाऱ्या आरोपींविरुद्ध विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि सर्व पोलीस ठाण्यांना प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.



## बलेनो कारसह ५.३७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ७ जुलै २०२६ रोजी यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. भांडगाव येथील सोनाक्षी मंगल कार्यालयासमोरील परिसरात नंबर नसलेल्या पांढऱ्या रंगाच्या बलेनो कारमध्ये तीन जण अवैध गावठी पिस्तुलांसह येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचे नियोजन करण्यात आले.

त्यानंतर दोन पंचांच्या उपस्थितीत स्थानिक गुन्हे शाखा आणि यवत पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्तपणे सापळा रचून संशयित बलेनो कार अडवली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर तसेच स्थानिक गुन्हे शाखा आणि यवत पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने संयुक्तपणे पार पाडली.

वाहनाची आणि तिघांची कायदेशीर झडती घेतली असता प्रत्येकाकडे एक-एक असे तीन गावठी पिस्तुले आणि १५ जिवंत काडतुसे आढळून आली. तसेच वापरातील बलेनो कारही जप्त करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे मंगेश शंकर मासोळे (वय २४), सुरज संजय शेलार (वय २६) आणि रोहित प्रेमदास भुजवणे (वय २४), सर्व रा. यवत, ता. दौंड, जि. पुणे अशी आहेत.

या प्रकरणी यवत पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६९२/२०२६ दाखल करण्यात आला असून संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींनी ही अवैध गावठी पिस्तुले कोठून आणली, ती कोणाकडून खरेदी केली आणि त्यामागील नेमका उद्देश काय होता, याचा सखोल तपास सुरू आहे. अटक आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# खेड तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामेला सुरुवात

## तहसीलदार प्रशांत बेंडसे यांनी दिली माहिती

राजगुरुनगर (दै. संध्या)



खेड तालुक्यात ५ ते ८ जुलै दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली असून, प्रशासनाकडून करण्यात येत असणारी मदतकार्य व उपाय योजना यावर सविस्तर माहिती तहसीलदार प्रशांत बेंडसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नायब तहसीलदार चेतन मोरे, राम बीजे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, कृषी अधिकारी विशाल विश्वे, महावितरणचे अभियंता उत्तम मंचरे, उपस्थित होते. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर तालुका आपत्ती व्यवस्थापन समितीची झालेल्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत तहसीलदार बेंडसे यांनी तालुक्यातील पूरस्थिती, जीवित हानी, शेतीची हानी,पशुधन,त्यासाठी बचाव व मदतकार्य तसेच प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती देताना सांगितले की, मुसळधार पावसामुळे अनेक नद्या, ओढे व नाले दुथडी भरून वाहू लागले. काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली, त्यामुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांच्या जीवनावश्यक वस्तू, घरगुती साहित्य व इतर मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाकडून नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे सुरू असून, पात्र नागरिकांना शासनाच्या नियमानुसार मदत देण्याची प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचेही तहसीलदार प्रशांत बेंडसे यांनी स्पष्ट केले. पशुधन बाबत बोलताना बेंडसे यांनी सांगीतले की अतिवृष्टी मुळे तालुक्यातील २६ मोठी जनावरे ,१० शेळ्या,व ४० कोंबड्या दगावल्या असून शासननिर्णय नुसार पंचनामा पूर्ण झाल्यानंतर संबंधितांना त्याची भरपाई देण्यात येईल. तहसीलदार बेंडसे म्हणाले तालुक्यातील आळंदी,चाकण तसेच पश्चिम पट्ट्यात पाईट, वाडा परिसरात सर्वाधिक म्हणजेच ११० मी.मी.पावसाची नोंद असून त्यामुळे पूरस्थिती परिस्थिती निर्माण होऊन वेगवेगळ्या भागातून पाच व्यक्तींना जीव गमवावा लागला. त्यांचे मृत्यू अहवाल प्राप्त होताच आपत्ती व्यवस्थापन निधीतून चार लाख रुपयांची तातडीची मदत केली जाईल. अतिवृष्टी मुळे महावितरणचे मोठे नुकसान झाले असून,तालुक्यातील विविध भागातून महावितरणचे ३२ पोल, उच्च दाब केबल, तारा तुटून पडल्या त्यामुळे काही काळासाठी २३७७ कुटुंबांना रहावे लागले. मात्र महावितरणकडून तातडीने २४ तासाच्या आत वीज पूर्ववत केली. त्याबरोबर पुरामुळे अनेक भागातील शेती वाहून गेल्याचे प्रकार घडले. रोप वाटिका लावलेली पिके यांचेही नुकसान झाल्याने संबंधित महसूल,कृषी अधिकारी व तलाठी घटनास्थळी पंचनामे करून प्राप्त अहवालानुसार भरपाई दिली जाईल त्यासाठी नुकसानग्रस्त शेतकरी बांधवाकडे फॉर्मर आय.डी.असणे आवश्यक असल्याचे तहसीलदार बेंडसे यांनी स्पष्ट केले.त्याबरोबर ताल तुटणे,माती खरडून गेलेल्या शेतीसाठी जल मृदा,व जल संधारण विभाग कडे त भरपाई करिता विनंती करणार आहे. अतिवृष्टी मुळे तालुक्यातील वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यात येणार असल्याचे बेंडसे यांनी यावेळी सांगितले.

### नैसर्गिक प्रवाह अडविणाऱ्यांवर होणार कारवाई

तालुक्यात अनेक ठिकाणी नैसर्गिक प्रवाह बदलल्याने रस्त्यावर पाणी येऊन वाहतूक व्यवस्था कोलमडली. विनापरवाना नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे निर्माण करून पूरस्थिती व नुकसानीला कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

- प्रशांत बेंडसे, खेड तहसीलदार

# जेजुरीच्या कडेपठार गडावर खंडोबा देवाचा गणपूजा उत्सव

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाचा गणपुजा उत्सव कडेपठार गडावर आषाढ शुद्ध प्रतिपदा मंगळवार १४ जुलै २०२६ रोजी रात्री होणार आहे. मंगळवारी मध्यरात्री सुरू होणारा हा उत्सव बुधवारी सकाळ पर्यंत सुरू राहणार आहे. गणपूजे दिवशी खंडोबा देवाच्या कडेपठार मंदिरामध्ये मानकरी, खांदकरी, पुजारी आणि भाविक एकत्र येऊन भंडाराची रास स्वयंभू लिंगावर तयार करून खंडोबा देवाची सामूहिक पूजा करतात . प्रतिपदा सुरू झाल्यानंतर प्रथम पाखाळणी (मासिक पुजा) होते .रात्री शेजारती वेळी सर्व मानकऱ्यांची पूजा होऊन भंडारा अर्पण केला जातो. यावेळी हजारो भाविक खंडोबा देवाच्या स्वयंभू लिंगावर भंडारा अर्पण करतात. या नंतर देवाची पंचारती मंदिराबाहेर घेऊन देवाचा छबिना सुरू होतो. भाविकांचा भंडारा जमा होऊन त्याची आकर्षक अशी रास व फुलांची आकर्षक सजावट देवाचे पुजारी व सेवेकरी यांच्या मार्फत केली जाते.



यावेळी घडशी समाजातर्फे पारंपरिक ढोल सनई वाजवली जाते. अखंड रात्रभर देवासमोर आपली कला सादर करून देवासमोर देवाची जुनी पदे तसेच अनेक भक्ती गीते गाऊन देवाचा जागर केला जातो. मंदिरासमोर संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले वाघ्या मुरुळी आपली सेवा देवाच्या चरणी अर्पण करत असतात. पहाटे सूर्यास्तापूर्वी छबिना प्रदक्षिणा पूर्ण करून मंदिरात परत येतो. पहाटे पासून राशीतील भंडारा भाविकांना प्रसाद म्हणून वाटला जातो. भाविक हा भंडारा घरी नेऊन देवघरात ठेवतात व वर्षभर आपल्या कपाळी देवाचा आशीर्वाद म्हणून लावतात.

# एमआयडीसी परिसरात पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

## बारामती कॅटल फीड्स प्रा. लि.च्या पुढाकारातून १५० वृक्ष लागवडीचा शुभारंभ

बारामती (दै. संध्या)




पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत बारामती एमआयडीसीतील कटफळजवळील पाण्याच्या टाकी परिसरात हिंदुस्तान फीड्स आयोजित गुरुवार, दि. ९ रोजी एमआयडीसीच्या सहकार्याने बारामती कॅटल फीड्स प्रा. लि. यांच्या पुढाकारातून भव्य वृक्षारोपण सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत १५० वृक्षांची लागवड करण्यात येणार असून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारीही कंपनीने स्वीकारली आहे.

कार्यक्रमाला एमआयडीसीचे अधिकारी श्री. पेठकर, श्री. संदीप पाटील साहेब , तालुका ग्रामीण पोलीस स्टेशनचे पीएसआय श्री. कल्याण शिंगाडे, बारामती अग्निशामक दलाचे श्री. नलावडे, श्री गलांडे साहेब बारामती कॅटल फीड्स प्रा. लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सचिन माने, बारामती चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष श्री. प्रमोदजी काकडे, शहाजी रणवरे, महावितरणचे श्री. कानतोडे, श्री. गावडे, हर्षल इंडस्ट्रीजचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. पंढरीनाथ कांबळे, महालक्ष्मी सिमेंट पाईप इंडस्ट्रीजचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजाभाऊ साळुंके तसेच एमआयडीसीतील विविध उद्योगांचे प्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्री. पेठकर यांनी मनोगतात पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे सांगितले. बारामती एमआयडीसी परिसरात यापूर्वीही मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आली असून, हरित परिसर अधिक समृद्ध करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहनही त्यांनी केले.

बारामती कॅटल फीड्स प्रा. लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सचिन माने यांनी सांगितले की, प्रादेशिक अधिकारी श्री. पेठकर आणि श्री. हनुमंतराव पाटील यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर अवघ्या तीन ते चार दिवसांत या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने १५० वृक्षांची लागवड करण्यात येणार असून त्यांचे नियमित संगोपन, संरक्षण आणि देखभाल करण्याची संपूर्ण जबाबदारी कंपनीकडून पार पाडली जाणार आहे.

सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वी ठरला. उपस्थितांनी अधिकाधिक वृक्ष लागवड करून हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बारामती घडविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आंतरराष्ट्रीय जित कांडो स्पर्धेमध्ये दौंड तालुक्यातील मुलींचे सुवर्ण यश

यवत (दैनिक संध्या) : शनिवार दि. २७ जून रोजी ग्लोबल वर्ड स्पोर्ट्स जित कांडो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या विद्यमाने अंधेरी स्पोर्ट्स अंधेरी मुंबई या ठिकाणी स्पर्धा मोठ्या दिमाखात पार पडल्या. या जित कांडो स्पर्धेमध्ये अनेक देशातून राज्यातून खेळाडूंनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. अशी माहिती आंतरराष्ट्रीय कोच प्रा.कैलास महानोर यांनी दिली. यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे :- १)स्वरा सोमनाथ दोरगे वय 13 सुवर्णपदक २)दुर्वा अजित शिंदे वय१२ सुवर्णपदक ३)आलिया नदी अन्सारी वय ११सुवर्णपदक ४)काव्या गणेश शिंदे वय १२ सुवर्णपदक ५)आराध्या दत्तात्रय कांचन वय १० सुवर्णपदक ६) समृद्धी मंगेश भोसले वय १२ रौप्य पदक ७) मायरा तुषार कांचन वय ७ रौप्यपदक ८) शिवांजली सोमनाथ दोरगे वय ८ रौप्यपदक ९)समृद्धी दिगंबर रणदिवे वय १३ रौप्यपदक १०) धनश्री संजय गोसावी वय १२ रौप्यपदक ११) समृद्धी विनोद जगताप वय १३ रौप्यपदक या सर्व खेळाडूंना प्रा.सचिन राऊत, प्रा.स्वप्निल भागवत, प्रा. कैलास महानोर यांचे मार्गदर्शन लाभले.

### दरडीच्या भीतीने गाव रिकामे, चोरट्यांचा धुमाकूळ; एका रात्रीत 20 घरफोड्या

लोणावळा (दैनिक संध्या) : दरड कोसळल्यानंतर नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने पाटण गाव रिकामे करण्याचे आदेश दिले. गावात सामसूम पाहून चोरट्यांनी एका रात्रीत तब्बल २० घरांतून लाखोंचे दागिने, रोकड आणि मौल्यवान वस्तू लंपास केल्या. या चोरीमुळे ग्रामस्थांमध्ये संताप, असुरक्षितता आणि प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त होत आहे. पाटण गावात दरड कोसळून एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर गावाला आणखी धोका होऊ नये, यासाठी ग्रामस्थांनीही जिवाच्या भीतीने घरे बंद करून नातेवाईक तसेच इतर सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. मात्र, गाव पूर्णपणे ओस पडल्याची संधी साधत गुरुवारी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी गावात धुमाकूळ घातला. मांडेकर, शेलार, वाळुंज, साठे, लोहट, कोंडभर, तिकोणे कुटुंबांची एकामागून सुमारे २० घरांचे कुलूप तोडून दागिने, रोख रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तू लंपास केल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.ग्रामस्थ गावात परतल्यानंतर घरांची झालेली तोडफोड आणि चोरीचा प्रकार उघडकीस आला. प्रशासन आणि पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत “आमच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची,” असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

# शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र ‘शेतीमाल मंत्रालय’ स्थापन करा

## विधानसभेत आमदार राहुल कुल यांची मागणी

यवत (दै. संध्या)

राज्याची आणि देशाची अर्थव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. मात्र, बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला आणि त्याच्या शेतीमालाला हक्काचे संरक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी शासनाने शेतीमालाच्या दरांवर शेतकऱ्यांचे थेट नियंत्रण राहील अशी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करावी आणि 'शेतीमाल मंत्रालय' सुरू करावे, अशी आग्रही मागणी दौंडचे आमदार ॲड. राहुल कुल यांनी विधानसभेत केली.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान नियम २९३ अन्वये आयोजित चर्चेत आमदार ॲड. राहुल कुल बोलत होते. यावेळी सभागृहाचे लक्ष वेधताना आमदार ॲड. राहुल कुल म्हणाले की, "आज देशाची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली आहे, तर जगाची लोकसंख्या ८०० कोटींवर पोहोचली आहे. २०५० पर्यंत ती ९७० कोटींवर जाईल, असा अंदाज आहे. अशा परिस्थितीत अन्न सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा असताना, अन्नधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्याला बाजारपेठेचे आणि दरांचे संरक्षण मिळणे आवश्यक आहे." कांदा, ऊस किंवा इतर कोणत्याही शेतीमालाचे दर एका रात्रीत वाढत किंवा कमी होत नाहीत. तसेच कोणत्याही पिकाचे उत्पादन एका रात्रीत अतिरिक्त होत नाही किंवा त्याचा तुटवडाही भासत नाही. या सर्व परिस्थितीची पूर्वकल्पना शासन स्तरावर असू शकते. मात्र, विविध विभागांमध्ये योग्य समन्वय



नसल्यामुळे कोणत्या पिकाची कधी आयात करायची आणि कधी निर्यात करायची, याबाबत ठोस निर्णय घेता येत नाही. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसतो. कांद्याचे दर कोसळले की शेतकरी अडचणीत येतो आणि दर वाढले की ग्राहकांना महाग मिळतो. ही अनिश्चितता संपवण्यासाठी शासकीय स्तरावर एक मजबूत समन्वय यंत्रणा उभी राहिली पाहिजे, असे कुल यांनी नमूद केले. साखरेचे दर आंतरराष्ट्रीय बाजारात म्हणावे तसे वाढत नसले, तरी उसाच्या दराबाबत शेतकऱ्यांच्या असणाऱ्या अपेक्षा पूर्णपणे योग्य आहेत. त्यासाठी आवश्यक असणारे आर्थिक मॅकेनिझम शासनाने तयार केले पाहिजे, जेणेकरून साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकरी दोघांनाही दिलासा मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा, बाजारात त्यांचे शोषण थांबावे आणि शेती क्षेत्राला स्थैर्य लाभावे, यासाठी शासनाने आपल्या मागण्यांची सकारात्मक नोंद घ्यावी, अशी अपेक्षा आमदार राहुल कुल यांनी शेवटी व्यक्त केली.

# शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात



सासवड (दै. संध्या)

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात प्रोत्साहन मिळावे या हेतूने कोडीत खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत नुकताच शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. कोडीत खुर्दचे माजी सरपंच श्री. प्रसाद खैरे व गावातील मान्यवरांच्या पुढाकाराने इयत्ता पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक कंपास पेटी, एक छत्री आणि चार फुलस्केप वह्या भेट देण्यात आल्या. या मदतीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. याप्रसंगी माजी सरपंच प्रसाद खैरे, माजी सरपंच विशाल कांबळे, माजी सरपंच सुरज औचरे, रोहन खैरे, पोलीस कर्मचारी निखिल खैरे, मोहन तळेकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. जयश्रीताई तळेकर, उपाध्यक्ष सौ. कल्याणीताई दिघे, सदस्या सौ. भाग्यश्री तळेकर, संतोष औचरे, चंद्रकांत खैरे आणि सुरेश भोसले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक गोरक्षनाथ चव्हाण यांनी केले, तर शाळेच्या मुख्याध्यापिका छाया कुंजीर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# एमआयडीसीच्यावतीने उद्योकपुरक वातारणनिर्मीतीवर भर

## उद्योजकांचे विविध विषय मार्गी लावण्याकरिता प्रयत्नशील-प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील

बारामती (दै. संध्या)

गुणवत्तापूर्व व पारदर्शक सेवेला प्राधान्य देत उद्योजकांचे विविध विषय मार्गी लावून त्यांचे समाधान होईल याद्दष्टीने एमआयडीसी कामकाज करीत आहे, प्रत्येक विषयनिहाय कालमर्यादित आढावा घेवून ते जलगतीने मार्गी लावण्यावर भर देण्यात येत आहे, उद्योजकांनी याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी केले.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्र सिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती येथील



प्रादेशिक कार्यालयात उद्योजकांच्या विविध समस्याबाबत बैठक संपन्न झाली. यावेळी प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता विजय पेटकर, बारामती औद्योगिक वसाहत संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार, बारामती चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रमोद काकडे, बारामती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे विभागीय अध्यक्ष शरद सूर्यवंशी, बारामती औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले, एमआयडीसी ही विकास प्राधिकरण असून कामकाज करताना गतीमानपद्धतीने कामकाज, सेवा देत असताना किमान कागदपत्रे घेण्यासोबत त्यामध्ये टप्पे कमी कसे करता येईल याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. एमआयडीसीचे कामकाज उद्योगपुरक होण्याकरिता व्यवसायानुकूलता (ईझ ऑफ डुईंग बिझिनेस) प्रमाणे कार्यवाही करावी.

एमआयडीसीमधील रस्ते, वीज, पाणीपुरवठा, कर्मचाऱ्यांच्या आरोग्य स्वच्छता आदीबाबींवर प्राधान्याने काम करीत वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालणे, उद्योगांमध्ये होणारे नवनवीन बदलाची अंमलबजावणी करावी, उद्योजकांना दर्जेदार व सुलभ सेवा देऊन बारामती एमआयडीसीने कामाच्या माध्यमातून राज्यात वेगळी ओळख निर्माण करुन नावलौकिक मिळवावे, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्र सिंह कुशवाह यांनी दिल्या आहेत.


‘व्हिजिटर्स इन्व्हेस्टर्स इंडस्ट्रियल असोसिएशन’ यांच्या वेळोवेळी बैठका घेवून मार्गदर्शन करावे. प्रलंबित विषय सोडविण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या संपर्कात राहून काम करावे. एमआयडीसीच्या बैठकींना जिल्हाधिकारी तथा इतर महत्वाच्या अधिकाऱ्यांना आपल्या कार्यक्रमांना आंमत्रित करावे, अशा सूचना अशाही सूचना दिल्या आहेत, त्याप्रमाणे एमआयडीसी कामकाज करीत असून उद्योजकांनीही त्याद्दष्टीने कामकाज करावे, असे आवाहन श्री पाटील यांनी केले.

श्री. पाटील यांनी बैठकीस आलेल्या सर्व संघटनांचे अध्यक्ष, प्रतिनिधी व उद्योजकांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. यावेळी बारामती एमआयडीसी देशात अग्रेसर राहण्याकरिता प्रयत्न करण्यात येईल, एमआयडीसीला सहकार्य करण्यात येईल, अशापद्धतीने उपस्थितांनी सहमती दर्शवली.





दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

## थोडक्यात पण महत्वाचे




### १३ वर्षे मुदतीचे २००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या १३ वर्षे मुदतीच्या २००० कोटींच्या '७.९१ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०३९'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

### १८ वर्षे मुदतीचे २२०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या १८ वर्षे मुदतीच्या २२०० कोटींच्या '७.७७ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०४४'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

### २३ वर्षे मुदतीचे १४०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या २३ वर्षे मुदतीच्या १४०० कोटींच्या '८.०७ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०४९'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. १४ जुलै २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् १४ जुलै २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

### २८ वर्षे मुदतीचे २००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या २८ वर्षे मुदतीच्या २००० कोटींच्या '७.७९ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०५४'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल.

# फिशिंग क्लस्टर उभारणीसाठी सकारात्मक प्रयत्न – मंत्री नितेश राणे

**मत्स्यव्यवसायाला नवी दिशा देणार**

■ मुंबई (दै. संध्या)

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील सिंचन प्रकल्पांमध्ये अत्याधुनिक फिशिंग क्लस्टर विकसित करण्यासाठी राज्य शासन सकारात्मक पावले उचलत असून, यामुळे स्थानिक मत्स्यव्यवसायाला चालना मिळण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक क्लस्टर विकास कार्यक्रम अंतर्गत उद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद मतदारसंघातील सिंचन प्रकल्पामध्ये फिशिंग क्लस्टर विकसित करण्याबाबत मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीस आमदार संजय कुटे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगण, मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी, तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्री नितेश राणे म्हणाले, महाराष्ट्र राज्य औद्योगिक क्लस्टर विकास कार्यक्रम अंतर्गत हा प्रकल्प विकसित झाल्यास मत्स्य उत्पादन, प्रक्रिया उद्योग, शीतसाखळी, मूल्यवर्धन आणि विपणन व्यवस्थेला मोठी चालना मिळेल, जळगाव जामोद तालुक्यात पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील तीन सिंचन तलाव असून, त्यावर चार नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांकडून मत्स्यबीज संचयन, मत्स्यसंवर्धन आणि




मत्स्य उत्पादनाची कामे नियमितपणे केली जात आहेत. फिशिंग क्लस्टर उभारल्यास या संस्थांचे उत्पन्न वाढण्यासह स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. बैठकीत गोराडा, राजुरा आणि सोनापल्ली या सिंचन तलावांवरील विद्यमान मत्स्यव्यवसायाचा आढावा घेण्यात आला. भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, मत्स्य प्रक्रिया केंद्रे, शीतसाखळी सुविधा, साठवणूक व्यवस्था आणि मत्स्याधारित पूरक उद्योग विकसित करण्यासाठी आवश्यक समन्वय साधण्याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी जळगाव जामोद तालुक्यात प्रस्तावित सुमारे १० हजार हेक्टर जलक्षेत्र असलेल्या जिगाव सिंचन प्रकल्पालाही भविष्यात फिशिंग क्लस्टर म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने मोठी क्षमता असल्याचे नमूद करण्यात आले. या प्रकल्पाला मान्यता मिळाल्यास विदर्भातील मत्स्य उत्पादन, मत्स्यबीज निर्मिती, प्रक्रिया उद्योग आणि मूल्यवर्धन क्षेत्राला नवी गती मिळेल तसेच बुलढाणा जिल्ह्यासह संपूर्ण परिसराच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## मुंबई वॉटर मेट्रोला मिळणार नवी गती; सिंधुदुर्गात उभारणार इलेक्ट्रिक बोट निर्मितीचा भव्य प्रकल्प – मंत्री नितेश राणे

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सागरी विकासाला नवी गती

■ महाराष्ट्र सागरी मंडळ आणि मे.झोया मरीन सर्व्हिसेस प्रा.लि.यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील सागरी वाहतूक अधिक आधुनिक, पर्यावरणपूरक आणि आत्मनिर्भर करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी जलयाने (वॉटर मेट्रो व्हेसल्स) उपलब्ध करून देणे तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात जहाजबांधणी सुविधा विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि मे. झोया मरीन सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्यात मंत्रालयात सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत हा करार झाला.

यावेळी मंत्री नितेश नितेश राणे म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सागरी क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर दिला जात आहे. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी अत्याधुनिक जलयाने उपलब्ध करून देण्याबरोबरच सिंधुदुर्गमध्ये इलेक्ट्रिक बोट निर्मितीचा उद्योग उभारल्यामुळे राज्याच्या सागरी अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळेल. यामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील,



आधुनिक जहाजबांधणीला चालना मिळेल.

या सामंजस्य करारानुसार मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी आवश्यक असलेली आधुनिक व पर्यावरणपूरक जलयाने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील तालवणे येथे सुमारे २२ एकर जागेवर सुमारे १५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत इलेक्ट्रिक बोट निर्मितीचा अत्याधुनिक कारखाना उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रात हरित सागरी वाहतुकीला चालना मिळण्यासोबतच जहाजबांधणी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढणार आहे.

या बैठकीत दोन्ही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा आराखडा, गुंतवणूक, तांत्रिक सहकार्य, स्थानिक कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती तसेच भविष्यातील सागरी उद्योगवृद्धीच्या विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यातील सागरी पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावणे, किनारपट्टी भागात औद्योगिक विकासाला चालना देणे आणि पर्यावरणपूरक जलवाहतूक व्यवस्था विकसित करणे, या दृष्टीने हा सामंजस्य करार महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. बैठकीस परिवहन व बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी,महाराष्ट्र सागरी मंडळाचे वरिष्ठ अधिकारी, मे. झोया मरीन सर्व्हिसेस प्रा. लि.चे संचालक जॉन फर्नांडिस, संचालक सुरज देवाढीया तसेच अंबर आयंदे, डॉ. निलेश बानवलीकर उपस्थित होते.



## मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर

■ मुंबई (दै. संध्या)

जातपात- धर्मापलीकडे मानवतेची पताका खांद्यावर घेत... डोळ्यांत विठ्ठल माऊलीच्या भेटीची आर्त ओढ साठवत... टाळ- मृदुंगाच्या गजरात... देहभान हरपत शेकडो मैल चालूनही अलौकिक चैतन्याची प्रचिती अनुभवत आणि माणसा-माणसांत साक्षात विठूरायाचे दर्शन घडविणाऱ्या पंढरीच्या वारीचा विस्मयकारक, अद्‌भूत आणि भव्य प्रवास आता रुपेरी पडद्यावर एका देखण्या माहितीपटाच्या माध्यमातून अवतरला आहे.'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विशेष खेळ (प्रीमियर शो) झाला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनीने या माहितीपटाची निर्मिती केली आहे. त्याचा प्रीमियर शो येथील आयनॉक्स चित्रपटगृहात काल रात्री झाला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर,d आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे आदी या वेळी उपस्थित होते. 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा माहितीपट 22 मिनिटांचा आहे. मराठी, इंग्रजी, हिंदी, तमीळ, तेलगू, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र शासनाचे ५, ८, १३, १८, २३ आणि २८ वर्षे मुदतीचे रोखे विक्रीस

■ मुंबई (दै. संध्या)

■ महाराष्ट्र शासनाचे ५ वर्षे मुदतीचे ८०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

महाराष्ट्र शासनाच्या पाच वर्षे मुदतीच्या ८०० कोटींच्या '७.३५ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०३१'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. १४ जुलै २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल.

## महाराष्ट्र शासनाचे ८ वर्षे मुदतीचे २२०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या ८ वर्षे मुदतीच्या २२०० कोटींच्या '७.५५ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०३४'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल.

कर्जरोख्याचा कालावधी ८ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २२ एप्रिल २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २२ एप्रिल २०३४ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७.५५ टक्के दरसाल दर शेकडा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी २२ ऑक्टोबर आणि २२ एप्रिल रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. १४ जुलै २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् १४ जुलै २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १५ जुलै २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

# राखीव प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सक्तीचे, नवे निर्देश : आ. शंकर जगताप

■ पिंपरी-चिंचवड ते नागपूर बोगस आदिवासी दाखला घोटाळ्याचा पर्दाफाश

■ २ प्राध्यापकांसह ११ जणांवर गुन्हा, ९ जणांना अटक

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार उघडकीस आला असून, अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाच्या राखीव जागा बोगस कागदपत्रांच्या आधारे लाटणाऱ्या ३२ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आले आहेत या बोगस जात वैधता प्रमाणपत्र घोटाळ्यामागे महाविद्यालयीन प्राध्यापक आणि दलालांचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचे समोर आले असून, याप्रकरणी नागपूर ग्रामीणमधील पाचगाव पोलीस ठाण्यात २ सहाय्यक प्राध्यापकांसह एकूण ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईअंतर्गत आतापर्यंत ९ आरोपींना अटक करण्यात आली



असून, उर्वरित दोन फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी गुरुवारी विधिमंडळ अधिवेशनात विचारण्यात आलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी ही माहिती दिली.

नागपूर येथील गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ऑफ टेक्नॉलॉजी (हुडकेश्वर रोड)

> हा केवळ एका कॉलेजपुरता मर्यादित प्रश्न नसून संपूर्ण महाराष्ट्रात बोगस आदिवासी दाखल्यांच्या आधारे शैक्षणिक प्रवेश, सरकारी नोकऱ्या आणि राजकीय लाभ मिळवण्याचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे दिसून येत आहे . मूळ आदिवासी समाजाच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या अशा दलालांवर आणि बोगस लाभार्थ्यांवर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (अॅट्रॉसिटी अॅक्ट) अंतर्गत गुन्हे दाखल करून अत्यंत कठोर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी आहे. भविष्यात अशा प्रकारच्या बोगस प्रमाणपत्र सादर करून होणाऱ्या प्रवेशांना आळा घालण्यासाठी 'ऑनलाइन पडताळणी प्रणाली' (डिजिटल वेरिफिकेशन सिस्टीम) विकसित करून ती एमएच-सीईटीच्या सर्व प्रवेश यंत्रणांशी जोडण्याची आणि या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी (SIT) मार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी केली.
>
> **– शंकर जगताप, आमदार चिंचवड विधानसभा**

येथे कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापकांच्या मदतीने दलालांमार्फत अनुसूचित जमातीची बोगस जात वैधता प्रमाणपत्रे तयार करण्यात आली होती. या बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे विद्यार्थ्यांनी नागपूरच्या संबंधित कॉलेजमध्ये आणि पुणे येथील पिंपरी चिंचवडमधील रावेत कॉलेजमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राखीव जागांवर प्रवेश मिळवले . अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांच्याकडे जेव्हा ही कागदपत्रे पडताळणीसाठी आली, तेव्हा हा सर्व बोगसगिरीचा प्रकार उघडकीस आला . त्यानंतर 'आयुक्त, संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI), पुणे' यांनी तात्काळ राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (MH-CET), मुंबई यांना पत्र लिहून संबंधित दोषी विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची शिफारस केली . त्यानुसार सीईटी सेलने या विद्यार्थ्यांचे व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश तात्काळ रद्द केले आहेत.

या गंभीर गुन्ह्याबाबत पाचगाव पोलीस ठाण्यात आरोपींवर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र (पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० च्या कलम १०, ११ व १२ सह भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील फसवणूक व बनावट कागदपत्रे तयार करण्याशी संबंधित विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी या प्रकरणात सखोल तपास करून ९ मुख्य आरोपींना जेरबंद केले असून, त्यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र देखील दाखल करण्यात आले आहे या रॅकेटमधील उर्वरित दोन फरार आरोपींचा शोध पोलीस पथकांद्वारे युद्धपातळीवर सुरू आहे. आमदार शंकर जगताप आणि नितीन पवार यांनी या बोगसगिरीबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता .

यावर बोलताना आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सांगितले की, शासनाने अनुसूचित जमाती पडताळणी समितीची राज्यातील सर्व १७ कार्यालये आधुनिक व अद्ययावत केली आहेत. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोर पालन व्हावे म्हणून कोणत्याही शिक्षण संस्थेने अनुसूचित जमाती वैधतेच्या अंतिम प्रमाणपत्राशिवाय राखीव जागेवर प्रवेश देऊ नयेत, असे कठोर निर्देश जारी करण्यात आले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### इम्मानुएल चर्चचा (79) वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

पुणे (दैनिक संध्या) : गुरुवार पेठ मोमीनपुरा येथील इम्मानुएल चर्चचा (७९) वा वर्धापन दिन भक्ती गीते व उपासनेच्याद्वारे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केक कापून प्रार्थना करत गीते गाऊन तसेच दहावी-बारावी पदवीधर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार त्याचप्रमाणे उपस्थित डॉक्टर मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुणे धर्मप्रांतचे बिशप.रा. रेव्ह. अल्फ्रेड सी तिवडे यांनी या स्थापनेचा दिनी पवित्र शास्त्रातील वचनांवर आधारित विशेष संदेश दिला. यावेळी इम्मानुएल चर्चचे प्रमुख रेव्ह विजय म्हंकाळे, चर्चचे सचिव किशोरी पाटोळे, तसेच समस्त चर्च कमिटी उपस्थित होते. याप्रसंगी पुणे शहरातून आलेल्या ख्रिस्ती बांधवांना स्नेहभोजनाचा आयोजन करण्यात आले होते.



### जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या वतीने कडेपठार पायथ्याशी वृक्षारोपण

जेजुरी (दैनिक संध्या) : पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जिजामाता शैक्षणिक संकुल, जेजुरी यांच्या वतीने आज शुक्रवार, दि. १० जुलै रोजी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. चंदुकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त कडेपठार गडाच्या पायथ्याशी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य माननीय नंदकुमार सागर, जिजामाता प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे आणि जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका कोमल चौगुले यांच्या हस्ते विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य नंदकुमार सागर म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर भविष्यातील पिढ्यांना समृद्ध आणि स्वच्छ पर्यावरण लाभेल. या उपक्रमाचे नियोजन राघू हारुळे, ज्योती खारतोडे, रसिका भुजबळ आणि नीता हंगारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कडेपठार परिसर अधिक हिरवागार व पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा वृक्षारोपण उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

### पालखी मार्गावरून कचरा संकलन

पुणे (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्ताने पालखी मार्गावर दिवसभर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. एका दिवसात पालखी मार्ग, मुक्कामस्थळे आणि वारकऱ्यांच्या वर्दळीच्या परिसरातून २७१.८४१ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या मोहिमेत महापालिकेच्या १ हजार १२० सेवकांनी ही 'सेवावारी' केली. घनकचरा व्यवस्थापन विभागाने पालखी मार्गावरील स्वच्छतेसाठी 'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' या उपक्रमांतर्गत विशेष नियोजन केले होते. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळांवर, विश्रांती केंद्रांवर, भोजन स्थळांवर तसेच पालखी मार्गालगत मोठ्या प्रमाणावर कचरा संकलनासाठी स्वतंत्र पथके तयार केली होती. संकलित कचऱ्यामध्ये ५४.४६२ मेट्रिक टन ओला तर २१७.३७९ मेट्रिक टन सुका कचरा होता. यामध्ये प्लास्टिक, पॅकेजिंग साहित्य, पत्रावळ्या, पाण्याच्या बाटल्या आणि इतर घनकचऱ्याचा समावेश आहे. कसबापेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतून सर्वाधिक १०२.५५० मेट्रिक टन, त्या खालोखाल नगर रस्ता-वडगावशेरी ५०.३०० मेट्रिक टन, वारजे-कर्वेनगर क्षेत्रातून ४२.०२५ मेट्रिक टन, विश्रामबागवाडा क्षेत्रातून २१.९७० मेट्रिक टन, तर इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतूनही मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे संकलन करण्यात आले. वारकऱ्यांना स्वच्छ वातावरण उपलब्ध व्हावे, दुर्गंधी किंवा अस्वच्छतेचा त्रास होऊ नये आणि पालखी मार्गावर आरोग्यविषयक कोणतीही समस्या निर्माण होऊ नये, यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिवसभर सतत देखरेख ठेवली, असे उपायुक्त संतोष वारूळे यांनी सांगितले.

# काळदरीचा टाहो : काळी आईच वाहून गेली

## आता जगायचं कसं? ढगफुटीने उडवला थरकाप

काळदरी (दै. संध्या)

निसर्गाचा अक्राळविक्राळ कोप काय असतो, याचा थरार सध्या काळदरीसारख्या दुर्गम आणि डोंगराळ भागात पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या ढगफुटीसदृश सततधार पावसाने संपूर्ण परिसराला झोडपून काढले असून, शेकडो शेतकऱ्यांचे संसार उघड्यावर आले आहेत. "शेतीसाठी मजूर नाहीत, पिकाला भाव नाही... आणि आता तर निसर्गाने शेताची मातीच वाहून नेली! आम्ही जगायचं कसं? आमच्या नशिबात फक्त आत्महत्याच लिहिली आहे का?" असा काळजाला पीळ पाडणारा संतप्त आणि उद्विग्न सवाल काळदरीचा प्रत्येक सर्वसामान्य शेतकरी आज प्रशासनाला विचारत आहे.

काळदरी येथील शेतातील विदारक दृश्ये पाहिली, तर पाषाणहृदयी माणसाच्या डोळ्यातही पाणी येईल. रात्रंदिवस रक्ताचं पाणी करून, दगड-धोंडे बाजूला सारून त्यांनी शेताच्या ताली (बांध) घातल्या होत्या. मात्र, या अस्मानी सुलतानी संकटामुळे त्या मजबूत दगडी ताली पत्त्यांसारख्या




कोसळल्या. ताली फुटल्यामुळे शेतातील पिके तर गेलीच, पण ज्या मातीने पोटाची खळगी भरली, ती सुपीक मातीच पुराच्या पाण्यासोबत वाहून गेली. आज तिथे फक्त दगड आणि चिखलाचे साम्राज्य उरले आहे. ही केवळ जमिनीची धूप नाही, तर एका कष्टकरी शेतकऱ्याच्या स्वप्नांची झालेली राखरांगोळी आहे.

आजचा शेतकरी चहूबाजूने संकटाच्या चक्रव्युहात सापडला आहे.

मजुरांचा तुटवडा: पेरणीपासून काढणीपर्यंत शेतात राबायला मजूर मिळत नाहीत.

भावाची हमी नाही: पदरचे पैसे लावून जे काही पिकवले, त्याला बाजारात दमडीचाही भाव मिळत नाही.

निसर्गाचा अंतिम घाला : राहिलेली कसर या पावसाने भरून काढली. जमीनच खरडून गेल्यामुळे आता पुढील अनेक वर्षे तिथे काहीही पिकवणे अशक्य झाले आहे.

प्रशासनाच्या सुस्त कारभारावर उपसरपंच राणी राहूल थोपटे यांनी तीव्र संताप व्यक्त करत

दरवेळी आपत्ती आली की, पंचनाम्यांचे कागदी घोडे नाचवले जातात. काळदरीतील दुर्गम भागात प्रशासकिय अधिकारी पंचनामे करत आहेत. पण मागच्या वर्षीची नुकसान भरपाई आजतागायत मिळालेली नाही. शेतकऱ्यांच्या या संयमाचा अंत पाहू नका. असे सांगितले.

शेतकरी हा या देशाचा कणा आहे, पण आज तोच कणा मोडून पडला आहे.

जर सरकारने तात्काळ आर्थिक मदत, कर्जमाफी आणि शेतजमीन पूर्ववत करण्यासाठी विशेष पॅकेज जाहीर केले नाही, तर काळदरी भागातील शेतकरी टोकाचे पाऊल उचलण्यास मागे-पुढे पाहणार नाहीत. त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीला केवळ आणि केवळ येथील सुस्त प्रशासन जबाबदार असेल असे समस्त काळदरी परिसरातील शेतकरी वर्गाने सांगितले.

## आळेफाटा परिसरात कचऱ्यामुळे साथीच्या आजारांचा धोका



नारायणगाव (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून आळेफाटा आणि परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शेतीला आणि पाण्याच्या साठ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, दुसरीकडे या पावसामुळे परिसरात सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरातील अनेक मुख्य रस्ते, रिकाम्या जागा आणि कचराकुंड्यांच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर ओला कचरा साचला आहे. पावसामुळे हा कचरा कुजण्यास सुरुवात झाली असून, संपूर्ण भागात दुर्गंधी पसरली आहे. या साचलेल्या घाणीमुळे डास, माश्या आणि इतर रोगजंतूंची संख्या झपाट्याने होत आहे. परिणामी, स्थानिक नागरिकांमध्ये साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. आळेफाटा आणि शेजारील काही गावांमध्ये नियमितपणे कचरा गोळा केला जात नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत.पावसाचे पाणी आणि कुजणारा कचरा एकत्र आल्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली आहे. यामुळे परिसरात ताप, सर्दी, खोकला आणि व्हायरल इन्फेक्शनच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि कमी प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. या परिस्थितीवर वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. प्रदीप यादव व डॉ. शिवाजी फड यांनी चिंता व्यक्त केली असून, नागरिकांना घर आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे, पाणी साचू न देण्याचे तसेच आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. वाढत्या आजारांना वेळीच रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## फिनोलेक्स पाईप्स, मुकुल माधव फाउंडेशनची सामाजिक बांधिलकी दृढ

चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वारकरी सेवा अभियानाचे उद्घाटन; जीवनावश्यक वस्तू, रेनकोट वाटप व आरोग्य शिबिरासह हरित वारीसाठीही पुढाकार

पुणे (दै. संध्या)

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने रवाना होत असताना राज्यभरातून लाखो वारकरी आळंदी आणि देहूमध्ये दाखल झाले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या पंढरपूर वारीशी फिनोलेक्स पाईप्सने गेली तीन दशके जपलेले सामाजिक बांधिलकीचे नाते यंदा अधिक दृढ केले आहे.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी फिनोलेक्स पाईप्सतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश पी. छाब्रिया, मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू पी. छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे.




आठशे वर्षांहून अधिक काळापासून पांडुरंगाच्या भेटीसाठी शेकडो किलोमीटर पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी यंदा फिनोलेक्स पाईप्सक आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सुमारे पाच लाख जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात येत आहे. यामध्ये तीन लाखांहून अधिक युटिलिटी बॅग, ५० हजार पावसाळी कुंचे (घोंगते), ज्येष्ठ वारकऱ्यांसाठी आधाराच्या काठ्या तसेच इतर आवश्यक साहित्याचा समावेश आहे. वारी मार्गावर विविध ठिकाणी आयोजित मोफत वैद्यकीय शिबिरांतून आरोग्य तपासणी, तज्ज्ञांचा सल्ला, औषधे आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा पुरविली जात आहे.

वारीच्या यशस्वी व्यवस्थापनासाठी कार्यरत असलेल्या पोलिस प्रशासनालाही फिनोलेक्सने मदतीचा हात दिला आहे. हजारो पोलिस कर्मचाऱ्यांना रेनकोट आणि पंढरपूर पोलिसांच्या 'क्विक रिस्पॉन्स टीम'साठी विशेष जॅकेट्स देण्यात आले आहेत. तसेच पंढरपूर पोलिस विभाग आणि मंदिर समितीच्या सहकार्याने वारकऱ्यांच्या सोयीसाठी माहिती व सतर्कता फलक उभारण्यात येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमार्फत राबविण्यात येत असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमांत स्वयंसेवकांना १० हजार टी-शर्ट्स व टोप्यांचे वाटप करण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देत पंढरपूरमध्ये वृक्षारोपण मोहीम आणि महत्त्वाच्या ठिकाणी कचरापेट्यांची व्यवस्था करण्यात येत आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, "भारतात 'पाईप' म्हटले की सर्वप्रथम फिनोलेक्स पाईप्स अँड फिटिंग्जचे नाव समोर येते. फिनोलेक्सने गेल्या ४५ वर्षांत महाराष्ट्रासह देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. उद्योग क्षेत्राबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वही तितक्याच प्रभावीपणे जपणाऱ्या फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनने गेली तीन दशके पंढरपूर वारीत वारकऱ्यांची सेवा करून समाजाप्रतीची बांधिलकी सिद्ध केली आहे. वारकऱ्यांसाठी आरोग्यसेवा आणि इतर सुविधा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम स्तुत्य आहे. या सेवाभावी उपक्रमाचे उद्घाटन करण्याची संधी मिळणे माझ्यासाठी आनंदाची बाब असून, फिनोलेक्ससारखी समाजहिताची परंपरा जपणारी कंपनी महाराष्ट्रात असल्याचा अभिमान वाटतो."

## लंडनहून निघालेली ऐतिहासिक 'ग्लोबल दिंडी' जेजुरीतून पंढरपूरच्या वाटेवर

जेजुरी (दै. संध्या)

आषाढी एकादशीच्या निमित्ताने महाराष्ट्रात वारकऱ्यांची लगबग सुरू असतानाच, यंदा सातासमुद्रापार एक नवा इतिहास घडला आहे. 'विठ्ठल... विठ्ठल' असा गजर करत लंडनच्या

रॉयल विंडसर रेसकोर्स वरून निघालेली पहिलीवहिली 'ग्लोबल वारी' ११ देशांचा प्रवास करून पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली आहे. ६ जून रोजी लंडनमधून प्रस्थान झालेली ही दिंडी तब्बल ५० दिवसांचा प्रवास करून २५ जुलैला आषाढी एकादशीच्या




दिवशी पंढरपूरमध्ये दाखल होणार आहे. दि 8 रोजी पुरंदर तालुक्यातील सासवड व दि 9 रोजी जेजुरी येथे मुक्काम करून हा सोहळा पंढरपूर कडे रवाना झाला आहे.

लंडनस्थित 'श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती' आणि अनिवासी भारतीय विठ्ठल भक्तांच्या पुढाकाराने या अनोख्या वारीचे आयोजन करण्यात आले आहे. ही दिंडी केवळ लंडनपुरती मर्यादित नसून ती नेदरलँड, बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, पोलंड, झेक रिपब्लिक, हंगेरी, रोमानिया आणि तुर्की अशा विविध देशांतून मार्गक्रमण करून हातात भगव्या पताका, कपाळी गंध आणि मुखात विठूनामाचा जप करीत वारकरी या जागतिक दिंडीत सहभागी झाले आहेत. जॉर्जिया येथून निघालेला हा सोहळा विमानाने मुंबई येथे दाखल झाला. आळंदी येथे दर्शन घेऊन पायी वारी सोहळ्याला सुरुवात झाली. सासवड येथे संत सोपानकाका व जेजुरी येथे कुलदैवताचे दर्शन घेऊन हा सोहळा वाल्हे कडे मार्गस्थ झाला .या सोहळ्यात लंडन मध्ये राहणारे महाराष्ट्रातील 25 वारकरी व राज्याच्या विविध भागातून दीडशे वारकरी सहभागी असून शेवटच्या टप्प्यात इंग्लंड हून अनेक भाविक या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.असे दिंडी चे प्रमुख डॉ अनिल खेडकर यांनी सांगितले.

### "लंडनमध्ये साकारणार भव्य विठ्ठल मंदिर"

या वारीचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे लंडनमध्ये उभारण्यात येणाऱ्या भव्य श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा प्रचार करणे हे आहे. युरोपमधील नवीन पिढीला वारकरी संप्रदायाची ओळख व्हावी आणि जगभरात विश्वशांतीचा संदेश जावा, यासाठी या 'ग्लोबल दिंडी'चे आयोजन करण्यात आले आहे. या दिंडीच्या माध्यमातून विठुरायाचा विचार आता जागतिक पातळीवर पोहोचला आहे.असे डॉ खेडकर यांनी सांगितले.

## चंद्रकांत वारघडे यांना 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार'

पर्यावरण संवर्धनातील उल्लेखनीय कार्याची महाराष्ट्र शासनाकडून दखल; पुणे विभागातून प्रथम क्रमांकाचा मान

कोरेगावमूळ (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या वतीने वन, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, जलसंधारण आणि लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत माहिती सेवा समितीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पर्यावरणप्रेमी चंद्रकांत गोविंद वारघडे पाटील यांना प्रतिष्ठेचा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे, पुणे विभागातून प्रथम क्रमांकाचा हा सन्मान मिळाल्याने पुणे जिल्हा, हवेली तालुका आणि बकोरी परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. चंद्रकांत वारघडे पाटील यांनी अनेक वर्षांपासून पर्यावरण संवर्धनाला जीवनध्येय मानून कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली माहिती सेवा समिती, दादा बाबाजी वारघडे प्रतिष्ठान आणि ट्री टॉक फाऊंडेशन यांच्या माध्यमातून



बकोरी परिसरात देवराई वनराई प्रकल्प यशस्वीपणे उभारण्यात आला. या प्रकल्पांतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण, जैवविविधतेचे संरक्षण, वन्यजीव व पक्ष्यांसाठी अधिवास निर्मिती, समांतर चर, जलसाठे उभारणी तसेच पर्यावरण जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात आले.

पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश त्यांनी वृक्षदिंडी, शालेय जनजागृती, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आणि लोकचळवळीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविला. त्यांच्या प्रेरणेतून हजारो नागरिक पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सहभागी झाले असून अनेक संस्थांनी वृक्षलागवड व संवर्धनाचे उपक्रम हाती घेतले आहेत.

महाराष्ट्र शासनाचा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' हा वन व पर्यावरण क्षेत्रातील सर्वोच्च आणि प्रतिष्ठेच्या पुरस्कारांपैकी एक मानला जातो. या पुरस्कारासाठी झालेली निवड ही चंद्रकांत वारघडे पाटील यांच्या दीर्घकालीन, सातत्यपूर्ण आणि निस्वार्थ पर्यावरण कार्याची पावती मानली जात आहे.

पुरस्कार जाहीर झाल्यानंतर विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, पत्रकार, वारकरी, स्वयंसेवक आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी चंद्रकांत वारघडे पाटील यांनी, "हा सन्मान माझा एकट्याचा नसून पर्यावरणासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा, स्वयंसेवकांचा, वृक्षमित्रांचा आणि नागरिकांचा आहे," अशी भावना व्यक्त केली. तसेच भविष्यात अधिक व्यापक लोकसहभागातून वृक्षलागवड, जलसंधारण, जैवविविधता संवर्धन आणि हरित महाराष्ट्र घडविण्यासाठी अधिक जोमाने कार्य सुरू ठेवण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

## वारकऱ्यांसाठी मोबाईल चार्जिंगची अभिनव सुविधा

पुणे (दै. संध्या)

■ महाऊर्जाचा स्वच्छ, हरित आणि शाश्वत ऊर्जेला चालना देणारा लोकाभिमुख उपक्रम

आषाढी वारीच्या अध्यात्मिक प्रवासाला यंदा हरित ऊर्जेची जोड मिळाली आहे. लाखो वारकऱ्यांना वारीदरम्यान कुटुंबीयांशी अखंड संपर्क ठेवता यावा आणि आपत्कालीन प्रसंगी मोबाईलचा वापर सहज करता यावा, यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांनी पालखी सोहळ्यात सहभागी दिंडींसाठी सौरऊर्जेवर आधारित मोबाईल चार्जिंग सुविधा उपलब्ध करून दिली आहे. स्वच्छ ऊर्जा, आधुनिक तंत्रज्ञान आणि वारकरी सेवेला एकत्र आणणारा हा अभिनव उपक्रम वारीमध्ये विशेष आकर्षण ठरत असून, अक्षय ऊर्जेच्या लोकाभिमुख वापराचे प्रभावी उदाहरण म्हणूनही पुढे येत आहे.

आषाढी वारी २०२६ निमित्त राज्यभरातून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी




सोहळ्यासोबत सहभागी होणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांची सुविधा लक्षात घेऊन महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) मार्फत सोलर मोबाईल चार्जर संच २५ जुलै २०२६ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या उपक्रमाद्वारे वारकऱ्यांना वारीदरम्यान मोबाईल चार्ज करण्याची स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि सुलभ सुविधा उपलब्ध झाली आहे.

वारीच्या प्रदीर्घ प्रवासादरम्यान वारकऱ्यांना कुटुंबीयांशी सातत्याने संपर्क ठेवता यावा, आवश्यक माहितीची देवाणघेवाण करता यावी तसेच आपत्कालीन परिस्थितीत मोबाईलचा वापर करता यावा, या उद्देशाने महाऊर्जाने पालखी सोहळ्यासमवेत दिंडींना सौरऊर्जेवर आधारित मोबाईल चार्जर संच उपलब्ध करून दिले आहेत. या संचांमुळे पारंपरिक वीजेवरील अवलंबित्व कमी होऊन अक्षय ऊर्जेचा प्रभावी वापर होत आहे.

महाऊर्जा राज्य शासनाच्या अक्षय ऊर्जा व ऊर्जा संवर्धन धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, आषाढी वारीतील हा उपक्रम स्वच्छ, हरित व शाश्वत ऊर्जेच्या प्रसारासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. वारकऱ्यांना प्रत्यक्ष सुविधा उपलब्ध करून देतानाच सौरऊर्जेच्या वापराबाबत जनजागृती करण्याचाही उद्देश या माध्यमातून साध्य होत आहे.